दैनिक

# चकमक

संपादक : शामसुंदर चितोडा

कार्यकारी संपादक : कैलास फुलारी

❋ वर्ष : ०१ ले ❋ ❋ अंक : ८४ ❋ ❋ रविवार २५ ऑक्टोबर २०२६ ❋ जालना ❋ ❋ किंमत : २ रूपये ❋ ❋ पृष्ठे : ४ ❋

◎ Volume 01 ◎ ◎ Issue 84 ◎ ◎ Sunday, Date : 25 October 2026 ◎ ◎ Jalna ◎ ◎ Price Rs. 2 ◎ Page 4


## जिल्हाधिकाऱ्यांच्या आदेशाला आव्हान? अनधिकृत पाणी उपसा रोखणाऱ्या पथकावर हल्ला; माळेगावात १२ जणांविरुद्ध गुन्हा!



गजानन माळकर / मंठा : जिल्हाधिकाऱ्यांच्या आदेशानुसार धरणातील अनधिकृत पाणी उपसा रोखण्यासाठी गेलेल्या शासकीय पथकावरच हल्ला झाल्याची धक्कादायक घटना मंठा तालुक्यातील माळेगाव शिवारातील दहा लघु तलाव परिसरात घडली. अनधिकृत पाणी उपसा रोखण्यासाठी यापूर्वी तोडलेले मोटारीचे कनेक्शन पुन्हा जोडल्याचे निदर्शनास आल्यानंतर ते बंद करण्यासाठी गेलेल्या पथकातील कर्मचाऱ्यांना शिवीगाळ करून लाथाबुक्क्यांनी मारहाण करण्यात आली. तसेच जिवे मारण्याच्या धमक्या दिल्याचा आरोप आहे. या प्रकरणी पाच जणांसह अन्य सात अनोळखी व्यक्तींविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

**कनेक्शन तोडले, तरी पुन्हा जोडले!**

पोलिसांत दाखल फिर्यादीनुसार, निरज दत्ता गायकवाड (वय ३३, व्यवसाय शासकीय मोजणीदार, पाटबंधारे विभाग, जालना अंतर्गत उपविभाग वाटूर, सिंचन शाखा क्रमांक १३) हे जिल्हाधिकाऱ्यांच्या आदेशानुसार तहसीलदारांनी स्थापन केलेल्या अनधिकृत पाणी उपसा पथकासोबत कार्यरत होते. दिनांक ९ ऑक्टोबर २०२६ रोजी या पथकाने माळेगाव शिवारातील दहा लघु तलाव परिसरात पाहणी केली होती. त्यावेळी धरणाशेजारील विहिरीवरून सुरू असलेल्या पाणी उपशासाठीच्या मोटारीचे कनेक्शन बंद करण्यात आले होते. मात्र, २३ ऑक्टोबर रोजी सकाळी ११ वाजण्याच्या सुमारास पथक पुन्हा पाहणीसाठी गेले असता, तोडलेले कनेक्शन पुन्हा जोडल्याचे निदर्शनास आले.

**शासकीय कर्तव्य बजावताना कर्मचाऱ्यांना मारहाण**

पथकातील कर्मचारी पुन्हा जोडलेले कनेक्शन बंद करण्याची कारवाई करत असताना आरोपींनी बेकायदेशीर जमाव जमवून शासकीय कर्मचाऱ्यांच्या कामात अडथळा आणल्याचे फिर्यादीत नमूद आहे. यावेळी कर्मचाऱ्यांना शिवीगाळ करून लाथाबुक्क्यांनी मारहाण करण्यात आली, तसेच जिवे मारण्याच्या धमक्या देण्यात आल्याचा आरोप आहे. या प्रकरणात विष्णू पांडू राठोड, संजय पांडू राठोड, सुखदेव पांडू राठोड, नारायण रूपा राठोड आणि अर्जुन रोहिदास राठोड (सर्व रा. माळेगाव, ता. मंठा, जि. जालना) यांच्यासह अन्य सात अनोळखी व्यक्तींचा समावेश असल्याचे फिर्यादीत म्हटले आहे.

**जिल्हाधिकाऱ्यांच्या आदेशाला आव्हान?**

धरणातील पाण्याचा अनधिकृत उपसा रोखण्यासाठी प्रशासनाने कारवाई केली असताना, तोडलेले कनेक्शन पुन्हा जोडल्याचा आणि कारवाईदरम्यान शासकीय कर्मचाऱ्यांना मारहाण केल्याचा आरोप गंभीर आहे. शासकीय अधिकारी व कर्मचारी आपले कर्तव्य बजावत असताना त्यांच्यावरच हल्ला होत असेल, तर प्रशासकीय कारवाईची अंमलबजावणी कशी होणार, असा प्रश्न या घटनेमुळे उपस्थित होत आहे. या प्रकरणी पोलिसांनी वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या आदेशानुसार गुन्हा दाखल केला असून, पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक माळगे यांच्याकडे सोपविण्यात आला आहे. आता या प्रकरणाच्या तपासातून नेमके काय निष्पन्न होते आणि शासकीय पथकाच्या कामात अडथळा आणल्याच्या आरोपांची चौकशी कशी होते, याकडे लक्ष लागले आहे.

## आरोप- प्रत्यारोप नको, दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांच्या मदतीला जा : उपमुख्यमंत्री शिंदे



मुंबई: एकमेकांवर सुरू असलेले आरोप- प्रत्यारोप थांबवा आणि दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांच्या मदतीला जा, असे निर्देश उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी शिवसेनेच्या मंत्री, आमदार आणि कार्यकर्त्यांना दिले आहेत. जरांगे पाटील यांनी व्हायरल केलेल्या ऑडिओ क्लिपनंतर शिवसेना आणि भाजप नेत्यांकडून एकमेकांवर आरोप प्रत्यारोपाच्या फैरी झाडल्या जात आहेत. आता ही कटुता दुर करून दुष्काळी परिस्थितीत शेतकऱ्यांना मदत करण्यासाठी पुढाकार घेण्याचे आदेश उपमुख्यमंत्र्यांनी सर्वांना दिले आहेत. राज्यातील दुष्काळाची परिस्थिती अत्यंत गंभीर असून अशा कठीण काळात शेतकऱ्याला आधार देणे हे आपले प्रथम कर्तव्य आहे. दसऱ्याच्या मुहूर्तावर शिवसेनेकडून दुष्काळग्रस्त भागांसाठी साडेतीन लाख धान्याची किट पाठवण्यात आली होती. ही (पान ३ वर)

## सौर ऊर्जा प्रकल्पाच्या माध्यमातून पशुसंवर्धन विभागाचे वीज बिल शून्यावर आणणार : पशुसंवर्धन मंत्री पंकजाताई मुंडे



मुंबई : सौर ऊर्जेचा प्रभावी वापर वाढविण्यासाठी पशुसंवर्धन विभागाने पावले उचलली आहेत. त्याचाच भाग म्हणून पशुसंवर्धन मंत्री पंकजा मुंडे यांच्या उपस्थितीत पशुसंवर्धन आयुक्तांच्या अधिपत्याखालील कार्यालये व प्रक्षेत्रांतील उपलब्ध जागेत सौरऊर्जा प्रकल्प राबविण्याच्या दृष्टीने विस्तृत प्रकल्प अहवाल तयार करण्यासाठी 'महाप्रीत'सोबत सामंजस्य करार करण्यात आला. पशुसंवर्धन आयुक्त डॉ. किरण पाटील, महाप्रीतचे संचालक दीपक कोकाटे यांनी स्वाक्षरी केल्या. पशुसंवर्धन विभागाचे सचिव डॉ. रामास्वामी एन., महाप्रितचे व्यवस्थापकीय संचालक बिपीन श्रीमाळी आदी उपस्थित होते. यावेळी पशुसंवर्धन मंत्री मुंडे म्हणाल्या की, सौर ऊर्जा प्रकल्पामुळे भविष्यात (पान ३ वर)

## दक्षता जनजागृती सप्ताह

मुंबई, : भ्रष्टाचारामुळे समाजाचे होणारे नुकसान टाळण्यासाठी दक्षता जनजागृतीसारखे उपक्रम नियमितपणे राबविले पाहिजे. भ्रष्टाचारमुक्त समाज निर्मितीसाठी नागरिकांचा सक्रीय सहभाग असणे गरजेचे आहे. केंद्रीय दक्षता आयोगाने जाहीर केल्यानुसार राज्यामध्ये २६ ऑक्टोबर ते १ नोव्हेंबर २०२६ या कालावधीत दक्षता जनजागृती सप्ताह साजरा करण्यात येत आहे. कुणीही राज्य सरकारी अधिकारी किंवा कर्मचारी भ्रष्टाचार (पान ३ वर)

## वाटूरला मटका जुगारावर कारवाई ; सवा लाखाचा मुद्देमाल जप्त

### विशेष पथकाची कारवाई २ दोघांविरूध्द दाखल



जालना, प्रतिनिधी : परतूर तालुक्यातील वादूर येथे सुरू असलेल्या मटका जुगारावर जालना पोलीस अधीक्षकांच्या विशेष पथकाने धडक कारवाई केली. या कारवाईत रोख रक्कम, तीन मोबाईल फोन आणि एक दुचाकी असा एकूण १ लाख १९ हजार ६७० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. या प्रकरणी दोन जणांविरुद्ध कारवाई करण्यात आली आहे.

जालना पोलिसांच्या विशेष पथकाने परतूर पोलीस ठाण्याच्या हद्दीत ही कारवाई केली. वादूर येथील खंडोबा मंदिराजवळ मटका जुगार सुरू असल्याची माहिती मिळाल्यानंतर पोलिसांनी धडक कारवाई करत जुगाराशी संबंधित साहित्य व मुद्देमाल ताब्यात घेतला.

**रोख रकमेसह मोबाईल आणि दुचाकी जप्त**

पोलिसांनी केलेल्या कारवाईत ७ हजार ६७० रुपये रोख, ३१ हजार रुपये किमतीचे तीन मोबाईल फोन आणि ८१ हजार रुपये किमतीची एक दुचाकी असा एकूण १ लाख १९ हजार ६७० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. या प्रकरणात धर्मराज लशीराम जाधव (रा. खंडोबा मंदिराजवळ, वादूर, ता. परतूर) आणि रोहित बाळू पिंपळे (रा. वादूर फाटा, वादूर, ता. परतूर) यांच्याविरुद्ध कारवाई करण्यात आली. पोलिसांच्या प्रसिद्धीपत्रकानुसार, धर्मराज जाधव याचा मटका जुगाराशी संबंधित मालक म्हणून उल्लेख करण्यात आला आहे.

**पोलीस अधीक्षकांच्या मार्गदर्शनाखाली कारवाई**

ही कारवाई जालना जिल्ह्याचे पोलीस अधीक्षक तेघबीरसिंग संधू यांच्या मार्गदर्शनाखाली विशेष पथकाने केली. या पथकात सपोनि अविनाश गडाख, पोउपनि दिनेश बर्डे, पोहेकॉ सचिन कोकणे, मेघा बोराडे, नंदकिशोर जैवाल, हरबक, शेजुळ आणि हाळदे यांच्यासह अन्य कर्मचाऱ्यांचा सहभाग होता. जिल्ह्यातील अवैध धंद्यांविरोधात पोलिसांकडून कारवाई सुरू असून, मटका जुगारासारख्या बेकायदेशीर प्रकारांवर नियंत्रण आणण्यासाठी पोलिसांनी अशा कारवाया अधिक तीव्र करण्याची भूमिका घेतली आहे.

## दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर नागरिकांनी सतर्क राहावे : अमोल मोरे

### देवठाणा शिवारात चोरटा पकडला; दोन शेळ्या व मोटरसायकल पोलिसांच्या ताब्यात ; तीन जण फरार



मंठा/ प्रतिनिधी : मंठा तालुक्यातील देवठाणा–मंठा शिवारात शुक्रवार (ता. २३) ऑक्टोबर) रात्रीच्या सुमारास शेतात चोरटे आल्याची माहिती ग्रामस्थांना मिळाल्यानंतर ग्रामस्थांनी तात्काळ शेतशिवारात धाव घेत एका चोरट्याला पकडले. घटनेची माहिती मिळताच सरपंच संघटनेचे अध्यक्ष अमोल मोरे यांनी मंठा पोलीस ठाण्याशी संपर्क साधून पोलीस निरीक्षक पुरुषोत्तम देशमुख यांना माहिती दिली.

माहिती मिळताच मंठा पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत संशयित चोरट्याला ताब्यात घेतले. त्याच्याकडून दोन शेळ्या व एक मोटरसायकल ताब्यात घेण्यात आल्याची माहिती आहे. दरम्यान, रात्रीच्या अंधाराचा फायदा घेत अन्य तीन चोरटे घटनास्थळावरून फरार झाले. सध्या तालुक्यात दुष्काळाची तीव्रता वाढत असून ग्रामीण भागात शेतकरी व नागरिकांच्या मालमत्तेच्या सुरक्षेचा प्रश्न निर्माण झाला आहे. शेतातील विद्युत वायर, बॅटऱ्या, शेती साहित्य तसेच जनावरे चोरीला जाण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे शेतकऱ्यांनी व ग्रामस्थांनी रात्रीच्या वेळी शेतशिवारात अनोळखी व्यक्ती आढळल्यास तातडीने पोलिसांना माहिती द्यावी, असे आवाहन अमोल मोरे यांनी केले आहे. दुष्काळाच्या परिस्थितीत नागरिकांनी अधिक सतर्क राहून गावातील तसेच शेतशिवारातील संशयास्पद हालचालींवर लक्ष ठेवावे आणि पोलिसांना सहकार्य करावे, असेही त्यांनी सांगितले.

## भोकरदनमध्ये अवैध तलवार बाळगणारा तरुण जेरबंद

### स्थानिक गुन्हे शाखेची कारवाई ; १ हजार ५०० रुपयांची तलवार जप्त



भोकरदन : जालना जिल्ह्यात अवैध शस्त्रे बाळगणाऱ्यांविरुद्ध कारवाई करण्याच्या सूचना पोलीस अधीक्षकांनी दिल्यानंतर स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने भोकरदन तालुक्यातील आन्वा येथे कारवाई केली. या कारवाईत अवैध तलवार बाळगल्याप्रकरणी २५ वर्षीय तरुणाला ताब्यात घेण्यात आले असून, त्याच्याकडून १ हजार ५०० रुपये किमतीची तलवार जप्त करण्यात आली आहे.

अभिषेक कृष्णा राऊत (वय २५, रा. आन्वा पाडा, भैरोबा (पान ३ वर)

## राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचा रविवारी विजयादशमी उत्सव : सघोष पथसंचलन व मान्यवरांचे मार्गदर्शन



परतूर/प्रतिनिधी : राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या शताब्दी वर्षानिमित्त परतूर येथे दरवर्षीप्रमाणे श्री विजयादशमी उत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. या उत्सवात शहरात सघोष पथसंचलन व मान्यवरांचे मार्गदर्शन होणार आहे. हिंदू समाजातील सामूहिक शक्ती आणि शौर्य जागृत करण्याच्या उद्देशाने स्वयंसेवक व नागरिकांनी सहकुटुंब सहभागी व्हावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

रविवार, २५ ऑक्टोबर २०२६ रोजी संध्याकाळी ५.०० वाजता मोंढा भागातील श्री योगानंद माध्यमिक विद्यालयाच्या मैदानावर उत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे.तत्पूर्वी दुपारी ३. ४५ वा.संघाच्या गणवेशात शहरातून सघोष पथसंचलन काढण्यात येणार असून या कार्यक्रमासाठी सामाजिक कार्यकर्ते तुळशीराम निकाळजे आणि मनोहर कार्लेकर हे प्रमुख अतिथी म्हणून तर राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे देवगिरी प्रांत सह प्रचारक राजेंद्र कोळपे हे प्रमुख वक्ते म्हणून मार्गदर्शन करणार आहेत. संघाच्या स्थापनेपासून सुरू असलेल्या कार्याचा आणि शताब्दी वर्षाच्या पार्श्वभूमीवर या उत्सवाला विशेष महत्त्व आहे. या उत्सवात स्वयंसेवकांनी, नागरिक आणि माता भगिनींनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन राष्ट्रीय स्वयंसेवक संघ, परतूर तालुका संघचालक डॉ.प्रमोद आकात यांनी केले आहे.

## काँग्रेसच्या महाराष्ट्र प्रभारी रेहाना चिश्ती व जिल्हाध्यक्ष कल्याण दळे यांच्या उपस्थितीत परतुर मंठा तालुक्यात दिवसभर भव्य मोटर सायकल रॅली संपन्न

परतूर/प्रतिनिधी : आज दिनांक २४ परतूर व मंठा तालुक्यात काँग्रेस पक्षाच्या वतीने यावर्षी पडलेल्या भीषण दुष्काळाच्या अनुषंगाने शासनाचे लक्ष वेधण्यासाठी तसेच एस आर संदर्भात जनजागृती व भारतीय निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांनी घेतलेल्या बेकायदेशीर, पक्षपाती व संविधान विरोधी निर्णयामुळे त्यांच्या राजीनामा मागणी करता तसेच त्यांच्यावर कठोर कायदेशीर कारवाईसाठी काँग्रेसच्या वतीने आज परतूर व मंठा तालुक्यात दिवसभर शासनाच्या निषेधार्थ रॅली काढण्यात आली. या रॅलीमध्ये मोठ्या संख्येने शेतकरी शेतमजुर व पक्षाचे कार्यकर्ते सहभागी झाले होते. यावेळी रॅलीमध्ये ज्ञानेश कुमार यांच्या राजीनाम्यासाठी तसेच जालना जिल्ह्यात भीषण दुष्काळ पडलेला असताना महाराष्ट्र शासनाने शेतकऱ्यांची थट्टा लावलेली आहे तसेच शेतकऱ्यांना अद्याप कवडीची मदत न केल्यामुळे संताप व्यक्त केला व शासनाचे विरोधात तीव्र घोषणाबाजी करण्यात आली.

या रॅलीचा समारोप परतुर येथे करण्यात आला. यावेळी संतप्त कार्यकर्त्यांनी भारतीय निवडणूक आयोगाचे मुख्य आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्या पुतळ्याचे दहन करण्यात आले.

यावेळी कार्यकर्त्यांना मार्गदर्शन करताना अखिल भारतीय काँग्रेस कमिटीच्या सचिव तथा सहप्रभारी महाराष्ट्र श्रीमती रेहना रियाज चिश्ती यांनी भारताचे मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांनी एसआर संदर्भात बेकायदेशीर निर्णय घेऊन भारतीय जनता पक्षाला बेकायदा सत्तेत येण्यासाठी मदत केली त्यामुळे त्यांच्या राजीनाम्याची यावेळी मागणी करण्यात आली त्यांनी राजीनामा न दिल्यास ज्ञानेश कुमार यांची केंद्रशासनाने तात्काळ हकालपट्टी करून त्यांच्यावर कठोर कायदेशीर कारवाई करावी असे आवाहन यावेळी त्यांनी केले.



यावेळी मार्गदर्शन करताना जालना जिल्हा काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष श्री कल्याण दळे यांनी महाराष्ट्र शासन भिषण दुष्काळी परिस्थिती असूनही शेतकऱ्यांकडे दुर्लक्ष करीत आहे तसेच ५ ००० रुपयाची मदत करण्याचे आश्वासन देऊन त्यांची थट्टा करत आहे मागील वर्षी जाहीर केलेली मदत अध्यापही न देता तसेच यावर्षीची नमो अनुदान सह इतरही कुठलेही अनुदान अग्रीम रक्कम सुद्धा शेतकऱ्यांना कवडीची रक्कम दिली नाही त्या मुळे यावेळी श्री दळे यांनी महाराष्ट्र शासनाचे तीव्र निषेध व्यक्त केला व शेतकरी भविष्यात भाजप शासनाला सरकारला धडा शिकवल्या शिवाय राहणार नाही असे सांगितले यावेळी मंठा तालुकयातील रॅलीचे नेतृत्व मंठा तालुका काँग्रेस कमिटीची अध्यक्ष श्री विवेक घारे तर परतुर तालुक्यातील रॅलीचे नेतृत्व परतुर तालुका काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष श्री बाळासाहेब आकात यांनी केले. यावेळी मोठ्या संख्येने मोटरसायकल रॅली ही सेवली, नेर, वाटुर, मंठा, सातोना, आष्टी परतुर सह ग्रामीण भागातून काढण्यात आली. यावेळी प्रदेश अल्पसंख्यांक विभागाचे उपाध्यक्ष बदर चाऊस अविनाश चव्हाण, अनवर बापू देशमुख, दिनेश राका अशोक उबाळे शरद बोराडे अंकुश तेलगड,इरशाद अन्सारी, जावेद पठाण, जफर पटेल, सिद्धार्थ बंड,संतोष दिंडे, बाजीराव खरात ,श्याम तेलगड यांच्यासह मंठा परतूर तालुक्यातील पदाधिकारी कार्यकर्ते शेतकरी शेतमजूर नागरिकांची मोठ्या संख्येने या कार्यक्रमात उपस्थिती होती.

# संपादकीय

## महिलांचे प्रतिनिधित्व

महिलांना करिअरमध्ये टिकून राहण्यासाठी, नेतृत्व विकसित करण्यासाठी आणि समान संधी मिळण्यासाठी संस्थात्मक पातळीवर सक्षम धोरणे राबविणे अधिक आवश्यक आहे. माजी नेस्ले इंडिया व्यवस्थापकीय संचालक सुरेश नारायणन यांच्या मते, केवळ कोट्यावर आधारित नियुक्त्यांपेक्षा गुणवत्तेवर निवड प्रक्रियेला प्राधान्य दिले पाहिजे. कंपन्यांनी अशी कार्यसंस्कृती निर्माण करणे गरजेचे आहे, जिथे महिलांना नेतृत्वाच्या संधी नैसर्गिकरीत्या उपलब्ध होतील. कॉर्पोरेट भारताने बोर्डरूममध्ये महिलांसाठी दारे उघडली असली, तरी सीईओ आणि एमडीसारख्या सर्वोच्च पदांपर्यंत महिलांची संख्या वाढविण्यासाठी अजून मोठा पल्ला गाठायचा आहे. आज महिलांनी शिक्षण, उद्योग, प्रशासन आणि विज्ञान अशा प्रत्येक क्षेत्रात आपल्या कर्तृत्वाची छाप उमटवली. तरीही सर्वोच्च नेतृत्वाच्या पदांपर्यंत पोहोचताना अद्यापही अनेक अदृश्य अडथळे उभे राहतात. संधीची समानता, गुणवत्तेचा सन्मान आणि निर्णय घेणाऱ्यांची मानसिकता या तीन गोष्टींची खरी परीक्षा याच टप्प्यावर होते. माजी पेप्सीको अध्यक्षा इंद्रा नूयी यांच्या अलीकडील वक्तव्याने हा प्रश्न पुन्हा एकदा चर्चेच्या केंद्रस्थानी आणला. महिलांना संधी मिळवण्यासाठी अजूनही लढावंच लागतं? या प्रश्नाचं उत्तर शोधताना सुधा मूर्ती यांच्या आयुष्यातील एक प्रसंग आपल्याला सांगून जातो की, शर्यत महिलांच्या क्षमतेची नसून त्यांना समान संधी देणाऱ्या समाजाच्या मानसिकतेची आहे आणि ती शर्यत अजून संपलेली नाही.

माजी पेप्सीको अध्यक्षा इंद्रा नूयी यांनी अमेरिकेतील एका कार्यक्रमात माजी अमेरिकन परराष्ट्रमंत्री कॉन्डोलीझ्झा रईस यांच्याशी संवाद साधताना असे वक्तव्य केले की, मी अमेरिकेबाहेरील कोणत्याही देशात, भारतातसुद्धा, सीईओ होऊ शकले नसते. कारण अमेरिकेची व्यवस्था गुणवत्तेला प्राधान्य देते. येथे मार्गदर्शक तुम्ही पुरुष आहात की महिला, तुमची जात, वंश किंवा पार्श्वभूमी काय आहे, यापेक्षा तुमच्यातील गुणवत्ता आणि क्षमता महत्त्वाची मानतात. या वक्तव्यानंतर भारतात मोठी चर्चा रंगली. काहींनी नूयी यांच्या मताशी सहमती दर्शवत भारतात अजूनही महिलांना सर्वोच्च नेतृत्वापर्यंत पोहोचताना अनेक संरचनात्मक अडथळ्यांना सामोरं जावं लागतं, असे म्हटले, तर अनेकांनी त्यांच्या विधानावर टीका करत भारतातील कॉर्पोरेट क्षेत्रात महिलांसाठी वाढलेल्या संधींकडे त्यांनी दुर्लक्ष केल्याचे मत व्यक्त केले. दुसरी गोष्ट भारतात जिथे महिला काम करतात तिथले वरिष्ठ महिलांविषयी काय विचार करतात किंवा त्यांचं मत काय असू शकतं हे देखील महत्त्वाचे आहे. या एकूणच पार्श्वभूमीवर मला एक किस्सा आठवतो.

महिलांना समान संधी मिळायला हव्यात, याचे सर्वात प्रभावी उदाहरण म्हणजे सुधा मूर्ती यांचा टेल्को अर्थात टाटामधील प्रवेश. हा प्रसंग आजही खासगी कंपनीतील महिलांच्या सक्षमीकरणाचा महत्त्वाचा टप्पा मानला जातो. सुधा मूर्ती यांनी एका मुलाखतीत सांगितलेला हा किस्सा. टेल्कोने अभियंत्यांच्या भरतीसाठी जाहिरात प्रसिद्ध केली होती. मात्र, त्या जाहिरातीच्या शेवटी 'महिला उमेदवारांनी अर्ज करू नये' अशी अट नमूद करण्यात आली होती. ही जाहिरात पाहिल्यानंतर सुधा मूर्ती यांनी थेट टाटा समूहाचे तत्कालीन अध्यक्ष जे. आर. डी. टाटा यांना पत्र लिहिलं. त्या पत्रात त्यांनी स्पष्टपणे नमूद केलं की, देशातील जवळपास ५0 टक्के लोकसंख्या महिलांची असताना, केवळ लिंगाच्या आधारावर त्यांना नोकरीपासून दूर ठेवणे योग्य नाही. हे पत्र वाचल्यानंतर जे. आर. डी. टाटा यांनी त्यांना मुलाखतीसाठी बोलावलं. मुलाखतीदरम्यान त्यांनी सांगितलं की, ही नियुक्ती जमशेदपूर येथे होती. त्या काळी तेथे बहुतांश कर्मचारी पुरुष होते आणि महिलांसाठी आवश्यक निवास व इतर सुविधा पुरेशा उपलब्ध नव्हत्या, त्यामुळेच ही अट जाहिरातीत टाकण्यात आली होती. मात्र, सुधा मूर्ती यांनी कोणतीही भीती न बाळगता ही नोकरी स्वीकारण्याची तयारी दर्शवली. त्या वेळी त्यांना अमेरिकेत पीएच.डी.साठी जाण्याची संधीही होती. तरीही त्यांनी टेल्कोमध्ये रुजू होण्याचा निर्णय घेतला. त्यांच्या या निर्णयामुळे टेल्कोमध्ये महिला अभियंत्यांसाठी दारे खुली झाली आणि पुढील अनेक महिलांना अभियांत्रिकी क्षेत्रात संधी मिळण्याचा मार्ग मोकळा झाला.

अमेरिकेनं मला जी संधी दिली ती मला भारतातही मिळाली नसती यावर नूयी यांच्याशी कोणी सहमत आहे, तर कोणी सहमत नाही. पण ज्यावेळी एखादी महिला मग ती त्या पदास लायक असेल, तर तिला त्या पदावर सन्मानानं विराजमान करणारी मानसिकता तिथे जिवंत असणंही तितकंच महत्त्वाचं आहे. सूधा मूर्ती या आपल्या कंपनीत रुजू होण्यास सक्षम आहेत मात्र त्यांच्या सुरक्षिततेच्यादृष्टीने टाटा यांनी अधिक विचार केला. ही वैचारिक पातळी आज किती कंपन्यांमधील वरिष्ठांमध्ये असेल. महिला सक्षमच आहेत पण त्याची जाणीव प्रत्येक क्षेत्रातील पुरुषालाही असायला हवी. अर्थात आज नूयी यांनी मांडलेला मुद्दा चुकीचा नाही. महिलांचे नेतृत्व, शिक्षण आणि करिअरविषयी आणि त्यांच्या पदाविषयी बोलायचे तर टॉप–५०० कंपन्यांमध्ये केवळ 0.४ टक्के महिला सीईओ असल्याचे समोर आलंय. या पार्श्वभूमीवर सुधा मूर्ती यांची भूमिका अधिक महत्त्वाची ठरते. त्यांच्या मते, महिलांना शिक्षण, कौशल्यविकास आणि करिअरमध्ये पुरुषांप्रमाणे समान संधी मिळाल्या पाहिजेत. मात्र, केवळ महिला असल्यामुळे कोणालाही पद मिळू नये हे मान्य नाही. नेतृत्वाच्या संधी पात्रता, मेहनत आणि गुणवत्तेच्या आधारावर मिळायला हव्यात. आर्थिक स्वातंत्र्यामुळे आज महिलांचा आत्मविश्वास वाढला आणि नेतृत्वाच्या संधीही विस्तारत आहेत. पण हे देखील इतकच खरं की कुटुंबातील जबाबदाऱ्या, सामाजिक अपेक्षा आणि कार्यस्थळावरील अडचणी यामुळे अनेक महिला करिअरच्या मधल्या टप्प्यात मागे पडतात, याकडेही आपण लक्ष वेधायला हवं. कंपन्यांनी महिलांना टिकून राहता येईल, प्रगती करता येईल आणि नेतृत्वाच्या भूमिका स्वीकारता येतील, असे सकारात्मक आणि समावेशक कार्यपरिसर निर्माण करणे गरजेचे आहे. नूयी यांच्या वक्तव्यानंतर भारतीय कॉर्पोरेट क्षेत्रात लिंगवैविध्य आणि महिलांच्या नेतृत्वाचा मुद्दा केंद्रस्थानी आला. बोर्डरूममध्ये महिलांचे प्रतिनिधित्व वाढल्याचे चित्र दिसत असले, तरी सर्वोच्च निर्णयक्षम पदांवर महिलांची उपस्थिती अत्यंत कमी असल्याचे समोर आले. ही परिस्थिती दर्शवते की महिलांना बोर्डमध्ये स्थान मिळत असले, तरी सर्वोच्च नेतृत्वापर्यंत पोहोचण्याचा त्यांचा प्रवास अजूनही कठीण आहे. भारतातील कॉर्पोरेट क्षेत्रात महिलांच्या प्रतिनिधित्वावर नव्याने चर्चा सुरू झाली. भारतात अनेक यशस्वी महिला उद्योगनेत्या घडल्या असल्या, तरी त्या अपवादात्मक उदाहरणे असल्याचे वास्तव आकडेवारी स्पष्ट करते. फॉर्च्यून कंपन्यांच्या आढाव्यातून स्पष्ट झाले, की देशातील जवळपास निम्मी लोकसंख्या महिला असतानाही नेतृत्वाच्या सर्वोच्च पदांवर त्यांचे प्रतिनिधित्व अत्यंत कमी आहे. कंपनी कायदा २०१३ अंतर्गत प्रत्येक पात्र कंपनीने किमान एक महिला स्वतंत्र संचालक नियुक्त करणे बंधनकारक करण्यात आले. या निर्णयाचा सकारात्मक परिणाम दिसून आला. सीएफए इन्स्टिट्यूट इंडियाच्या माहितीनुसार बोर्डवरील महिलांचे प्रतिनिधित्व सुमारे १९ टक्क्यांपर्यंत पोहोचले.

# देवतांचे दिव्य वैद्य अश्विनीकुमार! भारतीय संस्कृती, वेद आणि पुराणांमध्ये वर्णन असलेल्या देववैद्यांची अद्भुत गाथा

**विशेष लेख**
**कोजागिरी पोर्णिमा**
**श्रीकांत पाराशर पुष्कर, राजस्थान**




भारतीय वैदिक परंपरेत देवतांचे वैद्य म्हणून अश्विनीकुमारांना विशेष स्थान आहे. नासत्य आणि दस्र या नावांनी ओळखले जाणारे अश्विनीकुमार हे देवतांचे चिकित्सक, आरोग्यदाते आणि संकटातून मुक्त करणारे दिव्य शक्तिस्वरूप मानले जातात. ऋग्वेदासह विविध वैदिक ग्रंथ आणि पुराणांमध्ये त्यांच्या पराक्रमाचे, औषधोपचारांचे आणि परोपकारी कार्याचे वर्णन आढळते. मानवी जीवनात आरोग्य, तारुण्य, दृष्टी आणि नवचैतन्य यांचे महत्त्व अधोरेखित करणारी त्यांची गाथा आजही भारतीय संस्कृतीत श्रद्धेने सांगितली जाते.

**अश्विनी नक्षत्र आणि धार्मिक महत्त्व**

भारतीय पंचांगातील २७ नक्षत्रांपैकी अश्विनी हे पहिले नक्षत्र मानले जाते. या नक्षत्राचे अधिदेवता अश्विनीकुमार असल्याचे ज्योतिषपरंपरेत सांगितले जाते. अश्विनी नक्षत्राचा संबंध आरोग्य, चपळता, ऊर्जा, नव्या कार्याची सुरुवात आणि उपचारक्षमतेशी जोडला जातो.

अश्विनीकुमारांना घोड्याशी संबंधित प्रतीकात्मक स्वरूपात दर्शविले जाते. त्यांच्या रथाचे वर्णन तेजस्वी, वेगवान आणि सुवर्णमय असे आढळते. ते संकटात सापडलेल्या व्यक्तींना मदत करणारे, दुःख दूर करणारे आणि जीवनात नवचैतन्य निर्माण करणारे देवता म्हणून पूजले जातात.

अश्विनी नक्षत्राशी संबंधित धार्मिक मान्यतांनुसार, या नक्षत्राचा संबंध चंद्राच्या भ्रमणाशी आणि वैदिक कालगणनेशीही जोडला जातो. त्यामुळे अश्विनीकुमारांचे महत्त्व केवळ देववैद्य म्हणून मर्यादित नसून भारतीय धार्मिक आणि सांस्कृतिक परंपरेतही ते महत्त्वाचे स्थान राखतात.

**नासत्य आणि दस्र : देवतांचे दिव्य वैद्य**

अश्विनीकुमार हे दोन जुळे देवता आहेत. त्यांची नावे नासत्य आणि दस्र अशी आहेत. वैदिक साहित्यात त्यांचे वर्णन संकटग्रस्तांना मदत करणारे, रोगांपासून मुक्ती देणारे आणि गरजूंना आधार देणारे देवता म्हणून करण्यात आले आहे.

त्यांच्या कथांमध्ये वृद्धांना तारुण्य प्राप्त करून देणे, अंधांना दृष्टी मिळवून देणे, अपंगांना मदत करणे आणि गंभीर संकटात सापडलेल्या व्यक्तींचे रक्षण करणे अशा अनेक प्रसंगांचा उल्लेख आढळतो. या कथा भारतीय परंपरेतील उपचार, सेवा, करुणा आणि परोपकार या मूल्यांचे प्रतीक मानल्या जातात.

अश्विनीकुमारांची उपासना आरोग्य आणि कल्याणाच्या प्रार्थनेशी जोडलेली आहे. त्यांच्या कथांमधून संकटाच्या काळात धैर्य राखणे, गरजूंना मदत करणे आणि ज्ञानाचा उपयोग समाजाच्या हितासाठी करणे, असा संदेश मिळतो.

**महर्षी च्यवन यांना तारुण्य प्रदान केल्याची कथा**

अश्विनीकुमारांशी संबंधित सर्वाधिक प्रसिद्ध कथांपैकी महर्षी च्यवन यांची कथा विशेष महत्त्वाची आहे. पौराणिक कथेनुसार, महर्षी च्यवन हे वृद्धावस्थेत होते आणि त्यांनी दीर्घकाळ तपश्चर्या केली होती. राजा शर्यातीची कन्या सुकन्या हिचा विवाह त्यांच्याशी झाला होता.

अश्विनीकुमारांनी महर्षी च्यवन यांना पुन्हा तारुण्य प्राप्त करून दिल्याची कथा विविध पुराणपरंपरांमध्ये सांगितली जाते. या कथेमध्ये त्यांच्या वैद्यकीय कौशल्याचा आणि दिव्य उपचारशक्तीचा गौरव करण्यात आला आहे.

या उपकाराच्या बदल्यात महर्षी च्यवन यांनी अश्विनीकुमारांना सोमयागातील सोमपानाचा अधिकार मिळवून देण्याचा प्रयत्न केला. देवेंद्राने सुरुवातीला या निर्णयाला विरोध केला; कारण अश्विनीकुमारांना देवतांचे वैद्य मानले जात असले तरी त्यांना सोमपानाचा अधिकार देण्याबाबत मतभेद होते.

महर्षी च्यवन यांच्या प्रयत्नांमुळे अश्विनीकुमारांना सोमयागातील स्थान मिळाल्याचे कथेत वर्णन आहे. या प्रसंगातून कृतज्ञता, न्याय आणि केलेल्या उपकारांची जाणीव ठेवण्याचा संदेश मिळतो.

**अंधांना दृष्टी आणि रोग्यांना आरोग्य**

अश्विनीकुमारांच्या परोपकारी कार्याच्या अनेक कथा वैदिक साहित्यात आढळतात. महर्षी उपमन्यू यांना दृष्टी प्राप्त करून दिल्याची कथा तसेच विविध ऋषींच्या व्याधी दूर केल्याचे उल्लेख त्यांच्या उपचारक्षमतेचे प्रतीक मानले जातात.

काही कथांमध्ये त्यांनी अंधत्व दूर केले, जखमी व्यक्तींना मदत केली आणि अपंगांना पुन्हा सक्षम बनविले, असे वर्णन आहे. श्याव ऋषी, विश्पला आणि इतर व्यक्तींशी संबंधित कथांमध्येही अश्विनीकुमारांच्या उपचारकार्याचा उल्लेख आढळतो.

विश्पला हिच्या संदर्भातील ऋग्वेदीय कथेत युद्धात पाय गमावल्यानंतर तिला कृत्रिम अवयव मिळाल्याचे वर्णन आढळते. या कथेकडे प्राचीन भारतीय साहित्यातील वैद्यकीय कल्पना आणि पुनर्वसनाच्या संकल्पनेच्या दृष्टीनेही पाहिले जाते.

या सर्व कथांचा गाभा म्हणजे आजारी, दुर्बल किंवा संकटात सापडलेल्या व्यक्तीला मदत करणे. अश्विनीकुमारांचे स्वरूप आरोग्यसेवा, सहानुभूती आणि मानवी कल्याणाचे प्रतीक म्हणून समोर येते.

**आयुर्वेदाशी जोडलेली परंपरा**

भारतीय आयुर्वेदपरंपरेत अश्विनीकुमारांना वैद्यकशास्त्राशी संबंधित आद्य देवता मानले जाते. विविध वैदिक आणि पौराणिक कथांमध्ये इंद्र, भरद्वाज, धन्वंतरी, सुश्रुत आणि चरक यांसारख्या नावांशी संबंधित वैद्यकीय ज्ञानपरंपरेचे उल्लेख आढळतात.

अश्विनीकुमारांच्या कथांमध्ये औषधोपचार, शारीरिक व्याधींवर मात करणे आणि जीवनशक्ती पुनर्संचयित करणे या संकल्पना ठळकपणे दिसतात. त्यामुळे त्यांना भारतीय वैद्यकीय परंपरेतील आदर्श चिकित्सकांचे प्रतीक मानले जाते.

मात्र, या कथांचा विचार करताना धार्मिक श्रद्धा, पौराणिक आख्यायिका आणि ऐतिहासिक वैद्यकीय पुरावे यांमध्ये फरक ठेवणे आवश्यक आहे. अश्विनीकुमारांविषयीचे वर्णन हे प्रामुख्याने वैदिक आणि पौराणिक साहित्याच्या संदर्भातून समजून घ्यावे लागते.

**अश्विनीकुमारांच्या कथांमधून मिळणारा संदेश**

अश्विनीकुमारांची गाथा केवळ धार्मिक श्रद्धेपुरती मर्यादित नाही. त्यांच्या कथांमधून समाजाला अनेक महत्त्वाचे संदेश मिळतात. गरजूंच्या मदतीला धावून जाणे, ज्ञानाचा उपयोग लोककल्याणासाठी करणे, संकटग्रस्तांना आधार देणे आणि केलेल्या उपकारांची जाणीव ठेवणे ही मूल्ये त्यांच्या कथांमधून अधोरेखित होतात.

आरोग्यसेवा ही केवळ व्यवसाय नसून मानवसेवेचे महत्त्वाचे माध्यम आहे, ही भावना त्यांच्या देववैद्य स्वरूपातून व्यक्त होते. रोग्यांची सेवा, दुर्बलांना मदत आणि दुःख दूर करण्याची वृत्ती हीच त्यांच्या उपासनेची व्यापक प्रेरणा मानता येते.

**...निष्कर्ष...**

अश्विनीकुमार हे भारतीय वैदिक परंपरेतील आरोग्य, उपचार, तारुण्य आणि नवचैतन्याचे प्रतीक आहेत. नासत्य आणि दस्र या नावांनी ओळखल्या जाणाऱ्या या जुळ्या देवतांच्या कथा भारतीय संस्कृतीतील वैद्यकीय कल्पना, धार्मिक श्रद्धा आणि परोपकाराची परंपरा उलगडून दाखवतात. त्यांच्या गाथेतून मिळणारा सर्वात महत्त्वाचा संदेश म्हणजे ज्ञान, सेवा आणि करुणा यांच्या माध्यमातून मानवी जीवन अधिक निरोगी आणि समृद्ध करण्याचा प्रयत्न करणे.

# संपीडित जैविक वायू प्रकल्पांसाठी केंद्राकडून १० वर्षांची दरहमी

मुंबई : संपीडित जैविक वायू (सीबीजी) प्रकल्पांना चालना देण्यासाठी केंद्र सरकारकडून उत्पादित गॅसच्या खरेदीसाठी २० कोटी रुपयांपर्यंतची हमी आणि पुढील १० वर्षांसाठी दरहमी देण्यात येत आहे. याशिवाय पात्र प्रकल्पांना भांडवली खर्च व पायाभूत सुविधांसाठी आर्थिक सहाय्य उपलब्ध आहे. या योजनांचा लाभ घेताना उद्योजकांनी प्रकल्पाची आर्थिक व्यवहार्यता, कच्च्या मालाची वर्षभरातील उपलब्धता आणि तंत्रज्ञान भागीदाराची विश्वासार्हता यांची काळजीपूर्वक पडताळणी करावी, असा सल्ला केंद्र व राज्य शासनाच्या अधिकाऱ्यांनी दिला. केंद्रीय पेट्रोलियम व नैसर्गिक वायू मंत्रालयाच्या वतीने भारत पेट्रोलियम कॉर्पोरेशनच्या सहकार्याने मुंबईतील ताज प्रेसिडेंट हॉटेलमध्ये आयोजित गोबरधन योजना, आदर्श राज्य संपीडित जैविक वायू धोरण आणि सॅस्की २०२६–२७ या विषयावरील राज्यस्तरीय कार्यशाळेत झालेल्या प्रश्नोत्तरांच्या सत्रात अधिकाऱ्यांनी उद्योजकांच्या शंकांचे निरसन केले. या सत्रात केंद्रीय पेट्रोलियम व नैसर्गिक वायू मंत्रालयाचे संचालक विकास सिंह, नगरविकास विभागाचे उपसचिव अनिरुद्ध जेवळीकर, इंडियन ऑइल कॉर्पोरेशनचे कार्यकारी संचालक जयदीप चौधरी आणि हिंदुस्थान पेट्रोलियम कॉर्पोरेशनचे कार्यकारी संचालक मोहित धवन यांनी मार्गदर्शन केले. संपीडित जैविक वायू प्रकल्पांना मिळणाऱ्या आर्थिक सवलतींबाबत योजनेअंतर्गत गॅसच्या खरेदीसाठी २० कोटी रुपयांपर्यंतची हमी उपलब्ध असून, पुढील १० वर्षांसाठी गॅसच्या दराचीही हमी दिली जाते. केंद्रीय आर्थिक सहाय्याच्या तरतुदीनुसार पात्र उत्पादकांना भांडवली खर्चासाठी १.२५ कोटी रुपये आणि इतर पायाभूत सुविधांसाठी ०.७५ कोटी रुपये सहाय्य मिळते. दीर्घकालीन पाठबळ देणाऱ्या या तरतुदींमुळे प्रकल्प उभारणीसाठी उद्योजकांना प्रोत्साहन मिळू शकते, असे यावेळी नमूद करण्यात आले. 'गोबरधन' पोर्टलवर नोंदणी बंधनकारक प्रकल्प मंजुरीच्या प्रक्रियेबाबत यावेळी विस्तृत माहिती देण्यात आली. प्रत्येक प्रकल्पाची 'गोबरधन' पोर्टलवर नोंदणी करणे आवश्यक आहे. प्रकल्पाची नोंदणी झाल्यानंतर सविस्तर प्रकल्प अहवाल पोर्टलवर सादर करावा लागतो. अहवालात त्रुटी आढळल्यास प्रकल्प व्यवस्थापन संस्थेमार्फत त्या दूर करण्यासाठी मार्गदर्शन केले जाते. प्रकल्पाला संबंधित राज्य प्राधिकरणाकडून 'कन्सेंट टू एस्टॅब्लिश' ही पूर्वपरवानगी मिळाल्यानंतरच अनुदानासाठीची पात्रता पुढे जाते. परवानगी देताना कच्च्या मालाची उपलब्धता, पुरवठा करार आणि आवश्यक मंजुऱ्यांची पूर्तता तपासली जाते. पोर्टलद्वारे इंटरनेटशी जोडलेली उपकरणे आणि पर्यवेक्षण व नियंत्रण प्रणालीच्या मदतीने गॅसच्या गुणवत्तेवरही लक्ष ठेवले जाते, असे यावेळी स्पष्ट करण्यात आले. जैविक वायू निर्मितीनंतर उपलब्ध होणाऱ्या आंबवलेल्या सेंद्रिय खताच्या (एफओएम) विक्रीसाठीही उपाययोजना करण्यात येत आहेत. खत विपणन कंपन्यांनी त्यांच्या खतांमध्ये २० ते ३० टक्के एफओएम मिसळण्याच्या आणि स्वतःच्या विक्री साखळीच्या माध्यमातून त्याची विक्री करण्याच्या दृष्टीने प्रयत्न करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. कृषी व शेतकरी कल्याण मंत्रालयामार्फत कृषी विज्ञान केंद्रांच्या माध्यमातून शेतकऱ्यांमध्ये जनजागृती केली जात आहे. कृषी विद्यापीठांच्या सहकार्याने विविध भागांतील मातीच्या आरोग्यानुसार एफओएमचा अधिक प्रभावी वापर करण्यावरही भर दिला जात आहे. राज्यांनी स्थानिक परिस्थितीचा विचार करून आदर्श संपीडित जैविक वायू धोरण स्वीकारावे आणि आवश्यकतेनुसार अतिरिक्त सवलती द्याव्यात, असे आवाहन यावेळी करण्यात आले.

कच्च्या मालाची निवड करताना स्थानिक परिस्थिती महत्वाची

संपीडित जैविक वायू निर्मितीसाठी कोणता कच्चा माल अधिक उपयुक्त आहे, या प्रश्नावर भाताच्या पेंढ्यापासून तुलनेने अधिक उत्पादन मिळण्याची शक्यता असल्याचे अधिकाऱ्यांनी स्पष्ट केले. उपलब्ध माहितीनुसार, १०० किलो भाताच्या पेंढ्यापासून सुमारे १० ते १२ किलो वायू मिळू शकतो. साखर कारखान्यांतील प्रेसमडपासून चार ते सहा टक्के, नेपियर गवतापासून चार ते सहा टक्के आणि घनकचऱ्यापासून तीन ते पाच टक्के उत्पादन मिळणे शक्य आहे. मात्र, प्रकल्पाचे अर्थकारण केवळ कच्च्या मालापासून मिळणाऱ्या वायूच्या प्रमाणावर ठरत नाही. कच्च्या मालाची स्थानिक उपलब्धता, भांडवली गुंतवणूक, देखभाल खर्च, गॅस वाहिनीपासूनचे अंतर आणि उत्पादित गॅसला उपलब्ध होणारी बाजारपेठ या बाबीही तितक्याच महत्वाच्या आहेत. त्यामुळे प्रकल्प उभारण्यापूर्वी सर्व घटकांचा सखोल अभ्यास करावा, असे यावेळी स्पष्ट करण्यात आले.

> **गोबरधन योजना, आदर्श राज्य संपीडित जैविक वायू धोरण आणि सॅस्की कार्यशाळेत अधिकाऱ्यांनी केले उद्योजकांच्या शंकांचे निरसन**

योजनेतील आर्थिक सवलती आकर्षक असल्याने काही कंपन्या अवास्तव उत्पादनाचे आश्वासन देऊन उद्योजकांची दिशाभूल करण्याची शक्यता आहे. त्यामुळे अभियांत्रिकी, खरेदी व बांधकाम कंत्राटदार आणि तंत्रज्ञान भागीदार निवडताना त्यांचा अनुभव, तांत्रिक क्षमता आणि प्रत्यक्ष प्रकल्पांमधील कामगिरी तपासणे आवश्यक आहे. अन्यथा प्रकल्प उभारला जाऊनही अपेक्षित गॅस उत्पादन होणार नाही, असा इशारा यावेळी अधिकाऱ्यांनी दिला.

संपीडित जैविक वायू प्रकल्प हे जैवतंत्रज्ञानावर आधारित असल्याने कच्च्या मालाचे स्वरूप, त्याची गुणवत्ता आणि प्रक्रिया पद्धती यांचे ज्ञान असणे गरजेचे आहे. उदाहरणार्थ, जुन्या प्रेसमडपासून सुमारे दोन टक्के, तर ताज्या प्रेसमडपासून सहा टक्क्यांपर्यंत उत्पादन मिळू शकते. त्यामुळे वर्षभर पुरेसा कच्चा माल मिळेल का, याचा आधीच अंदाज घ्यावा. तसेच प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या नियमांची आणि आवश्यक परवानग्यांची माहिती प्रकल्प उभारणीपूर्वीच करून घ्यावी, असे आवाहनही यावेळी करण्यात आले. फक्त घनकचऱ्यावर आधारित प्रकल्पांच्या आर्थिक सहाय्याबाबतही यावेळी प्रश्न उपस्थित करण्यात आले. भारतीय मानक ब्युरोच्या निकषांनुसार उत्पादित गॅस गुणवत्ता मानके पूर्ण करत असल्यास कच्च्या मालाचा प्रकार कोणताही असला तरी गॅस खरेदी आणि दरहमीच्या तरतुदी लागू होतात, असे या सत्रात स्पष्ट करण्यात आले. मात्र, घनकचऱ्यावर आधारित प्रकल्पांसाठी केंद्रीय गृहनिर्माण व नागरी व्यवहार मंत्रालयाच्या स्वतंत्र योजनाही असल्याने प्रामुख्याने घनकचरा वापरणाऱ्या प्रकल्पांना भांडवली अनुदान मिळण्याबाबत वेगळे निकष लागू होऊ शकतात. विविध प्रकारचे कच्चे पदार्थ एकत्र वापरणारे प्रकल्प संबंधित अटींची पूर्तता केल्यास भांडवली सहाय्यासाठी पात्र ठरू शकतात.

प्रकल्प उभारण्यास इच्छुक उद्योजकांना प्रत्यक्ष कार्यरत प्रकल्प पाहता यावेत, यासाठी अभ्यासभेटी आयोजित करण्याची मागणी यावेळी करण्यात आली. त्यावर सेंटर फॉर सायन्स अँड एन्व्हायर्नमेंट, राज्य शासन आणि तेल विपणन कंपन्यांचे राज्य समन्वयक यांच्या सहकार्याने अशा भेटींचे आयोजन करता येईल, असे यावेळी स्पष्ट करण्यात आले. या प्रश्नोत्तर सत्रातून प्रकल्प उभारणीची प्रक्रिया, आर्थिक सहाय्य, तंत्रज्ञानाची निवड, कच्च्या मालाचे व्यवस्थापन आणि उत्पादित गॅसच्या विक्रीसंबंधीच्या महत्त्वाच्या बाबींवर मार्गदर्शन करण्यात आले. त्यामुळे संपीडित जैविक वायू क्षेत्रात गुंतवणूक करू इच्छिणाऱ्या उद्योजकांना प्रकल्पाचे नियोजन अधिक वास्तववादी आणि परिणामकारक पद्धतीने करण्यासाठी मदत होईल, असा विश्वास यावेळी व्यक्त करण्यात आला.

# चक्रीवादळाचं संकट;

महाराष्ट्रातील हवामानात सातत्याने उलटफेर पाहिला मिळतोय. बंगालच्या उपसागरात मोठा बदल पाहिला मिळत असल्याने पुन्हा एकद चक्रीवादळाचे संकट घोंघावत आहे. हे वादळ उत्तर आंध्र प्रदेश आणि लगतच्या दक्षिण ओडिशाच्या किनारपट्टीच्या दिशेने सरकत असल्याचा अंदाज हवामान विभागाने वर्तविला आहे. तर महाराष्ट्रातील हवामानातही मोठा बदल पाहिला मिळतोय. हवामान विभागाने कोकणातील काही जिल्ह्यांमध्ये उष्ण आणि दमट वातावरणाचा इशारा दिला आहे. तरदुसरीकडे रत्नागिरी आणि सिंधुदुर्ग जिल्ह्यांत हलक्या ते मध्यम पावसाची शक्यता वर्तवली आहे. तर उत्तर महाराष्ट्र, मराठवाडा आणि विदर्भातील काही भागात कोरडे हवामान असणार आहे. पालघर, ठाणे, मुंबई आणि रायगड जिल्ह्यांत हवामान उष्ण आणि दमट राहणार असल्याने लोकांनी घराबाहेर पडताना छत्री आणि पाणी जवळ ठेवावे. तर रत्नागिरी आणि सिंधुदुर्ग जिल्ह्यात संध्याकाळच्या वेळी हलक्या ते मध्यम स्वरूपाचा पावसाची शक्यता आहे. कोकणासह कोल्हापूर आणि घाटामाथा परिसरात हलका ते मध्यम पावसाचा अंदाज हवामान खात्याने वर्तविला आहे. सातात्यातही पावसाचा अंदाज आहे. तर पुणे, सांगली आणि सोलापूर जिल्ह्यांत कोरडे हवामान राहील, असा हवामान खात्याने सांगितलं आहे.

# सावंतवाडी- मुंबई ट्रेनच्या वेळेमध्ये बदल

**मुंबई: कोकणवासीयांसाठी महत्त्वाची बातमी आहे. सावंतवाडी रोडवरून मुंबई सीएसएमटीकडे दररोज धावणाऱ्या एक्स्प्रेसच्या वेळापत्रकामध्ये बदल करण्यात आला आहे. १५0८८ अप सावंतवाडी रोड– मुंबई सीएसएमटी एक्स्प्रेसच्या वेळेमध्ये बदल करण्यात येणार आहे. ऐन सणासुदीच्या काळामध्ये हा बदल करण्यात येणार नसून दिवाळीनंतर एक्स्प्रेसच्या वेळेमध्ये बदल करण्यात येणार आहे.** एक्स्प्रेसचं हे वेळापत्रक नेमकं केव्हापासून लागू होणार आहे, जाणून घेऊया. मुंबई सीएसएमटी ते सावंतवाडी रोड दरम्यान दररोज धावणारी एक नवीन एक्स्प्रेस मध्य रेल्वेकडून सुरू करण्यात आली आहे. ही एक्स्प्रेस दररोज मध्यरात्री ११.५५ मिनिटांनी मुंबई सीएसएमटी स्थानकावरून सुटते आणि सावंतवाडी रोड स्थानकावर दुपारी ०२.१५ मिनिटांनी पोहोचते. परतीच्या प्रवासासाठी ही एक्स्प्रेस सावंतवाडी रोड स्थानकावरून दररोज सायंकाळी ०५.२० मिनिटांनी सुटते आणि मुंबई सीएसएमटी स्थानकावर दुसऱ्या दिवशी सकाळी ०६.४० वाजता पोहोचते. ही एक्स्प्रेस दररोज धावत असल्यामुळे कोकणवासीयांना फार मोठा दिलासा मिळतो. पण आता ह्या एक्स्प्रेसच्या परतीच्या प्रवासाच्या वेळेमध्ये बदल होणार आहे. १५0८८ अप सावंतवाडी रोड– मुंबई सीएसएमटी एक्सप्रेस ०९ सप्टेंबर २०२६ पासून दररोज सावंतवाडी रोड स्थानकावरून पावसाळी वेळापत्रकाप्रमाणे सुटते. तर, आता २१ ऑक्टोबर २०२६ पासून साध्या वेळापत्रकानुसार, सायंकाळी ०६.४0 वाजता सुटते. तर, आता नव्या वेळापत्रकानुसार सावंतवाडी रोड– मुंबई सीएसएमटी एक्सप्रेस १५ डिसेंबर २०२६ पासून सावंतवाडी रोड स्थानकावरून सायंकाळी ०६.२० वाजता सुटेल आणि दुसऱ्या दिवशी मुंबई सीएसएमटी स्थानकावर सकाळी ०६ वाजता पोहोचेल. नेहमीच्या वेळेप्रमाणे ही एक्स्प्रेस २० मिनिटे आधी सुटणार आहे. ऐन दिवाळीच्या दिवसांमध्ये कोकण रेल्वेने वेळापत्रकामध्ये बदल केला नसून सणासुदीनंतर वेळापत्रकामध्ये बदल करण्याचा निर्णय घेतला.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक शामसुंदर चितोडा यांनी **जगमित्र ऑफसेट भोकरदन नाका, संभाजीनगर ता.जि.जालना ४३१२०३ (महाराष्ट्र)** येथे छापून, दैनिक चकमक कार्यालय जालना येथे प्रसिध्द केले. पि.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी ✻ यांची राहील. **संपादक शामसुंदर चितोडा, कार्यकारी संपादक कैलास फुलारी** (जालना जिल्हा न्यायालयाअंतर्गत) RNI NO.MHMAR/26/A4110 **मो.न.९४२२७९६०८८, ९४०३४९४४२२**

# आदिवासी विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षण द्या; मंत्री डॉ. अशोक वुईके यांचे शिक्षकांना आवाहन



नाशिक: आदिवासी विद्यार्थ्यांना उच्च दर्जाचे आणि गुणवत्तापूर्ण शिक्षणाच्या संधी उपलब्ध करून देत त्यांचे शैक्षणिक भवितव्य घडवण्यात शिक्षकांची भूमिका महत्त्वपूर्ण आहे. पवित्र पोर्टलच्या माध्यमातून पारदर्शक प्रक्रियेद्वारे नियुक्त झालेल्या शिक्षकांनी आदिवासी विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी काम करावे. शिवाय, नियुक्तीच्या ठिकाणी पूर्ण वेळ वास्तव्यास राहून विद्यार्थ्यांना नियमित आणि दर्जेदार शिक्षण द्यावे, असे आवाहन राज्याचे आदिवासी विकास मंत्री डॉ. अशोक वुईके यांनी शिक्षकांना केले. एकलव्य रेसिडेन्शियल पब्लिक स्कूल, नाशिक येथे आदिवासी विकास विभागात पवित्र पोर्टलच्या माध्यमातून नवनियुक्त झालेल्या शिक्षकांशी संवाद साधताना मंत्री डॉ. वुईके बोलत होते. यावेळी अन्न व औषध प्रशासन मंत्री नरहरी झिरवाळ, खासदार भास्कर भगरे, आमदार किशोर दराडे, आमदार हिरामण खोसकर, आदिवासी विकास विभागाच्या आयुक्त लीना बनसोड यांच्यासह वेगवेगळ्या विभागाचे अधिकारी, कर्मचारी आणि नवनियुक्त शिक्षक उपस्थित होते. आदिवासी विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षण मिळावे, त्यांच्या शैक्षणिक गुणवत्तेत वाढ व्हावी आणि त्यांना प्रगतीच्या व्यापक संधी उपलब्ध व्हाव्यात, यासाठी विभाग प्रयत्नशील आहे. विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीसोबतच त्यांच्या व्यक्तिमत्त्व विकासाकडेही शिक्षकांनी विशेष लक्ष द्यावे. पात्र व सक्षम शिक्षकांची नियुक्ती करून शिक्षणाचा दर्जा उंचावण्यासाठी पवित्र पोर्टलच्या माध्यमातून पारदर्शक भरती प्रक्रिया राबवण्यात आली आहे. या प्रक्रियेत गुणवत्तेला प्राधान्य देण्यात आल्याचे मंत्री डॉ. वुईके यांनी सांगितले.

शिक्षकांनी नियुक्तीकडे केवळ नोकरीची संधी म्हणून न पाहता आदिवासी समाजातील विद्यार्थ्यांचे भविष्य घडविण्याची जबाबदारी म्हणून पाहावे. विद्यार्थ्यांची नियमित उपस्थिती, शाळांमधील प्रवेश संख्या आणि शैक्षणिक गुणवत्ता वाढविण्यासाठी शिक्षकांनी सक्रिय सहभाग घ्यावा. विद्यार्थ्यांना आधुनिक ज्ञान, आवश्यक शैक्षणिक सुविधा आणि प्रभावी अध्यापन उपलब्ध करून देण्यासाठी शिक्षकांनी आपल्या ज्ञानाचा व कौशल्यांचा उपयोग करावा. आदिवासी विद्यार्थ्यांना शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणून त्यांना उज्ज्वल भवितव्यासाठी सक्षम करणे, हे सर्वांचे सामूहिक दायित्व असल्याचे मंत्री डॉ. वुईके यांनी सांगितले. अन्न व औषध प्रशासन मंत्री झिरवाळ सांगितले की, विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी गुणवत्तापूर्ण शिक्षणासोबतच शिक्षकांचे योग्य मार्गदर्शन आवश्यक आहे. विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वास, कौशल्ये आणि महत्त्वाकांक्षा विकसित करण्यासाठी शिक्षकांनी प्रयत्न करावेत. प्रत्येक विद्यार्थ्याची क्षमता ओळखून त्याला प्रोत्साहन दिल्यास तो जीवनात प्रगती करू शकतो. विद्यार्थ्यांमध्ये मूलभूत कौशल्ये विकसित करण्यासाठी नियमित सराव, वैयक्तिक मार्गदर्शन आणि सातत्यपूर्ण प्रयत्न महत्त्वाचे आहेत. शिक्षकांनी केवळ अध्यापनापुरते मर्यादित न राहता विद्यार्थ्यांमधील सुप्त गुणांना वाव द्यावा, असे आवाहन त्यांनी केले.

# मंत्री छगन भुजबळ नाशिक जिल्ह्यातील दुष्काळ परिस्थितीचा घेतला आढावा, अधिकाऱ्यांना दिले महत्त्वाचे आदेश



नाशिक: संपूर्ण महाराष्ट्रामध्ये दुष्काळ परिस्थिती आहे. दुष्काळ परिस्थितीचा आढावा घेण्यासाठी अनेक मंत्री आपल्या जिल्ह्यामध्ये जाताना दिसत आहेत. नाशिक जिल्ह्याचे पालकमंत्री छगन भुजबळ यांनीही नाशिक जिल्ह्यातील दुष्काळजन्य परिस्थितीचा आढावा घेतला. दुष्काळाच्या परिस्थितीत नागरिकांना पिण्याचे पाणी, अन्नधान्य वितरण आणि पशुधनासाठी चारा उपलब्ध करून देण्यासाठी प्रशासनाने प्रभावी नियोजन करण्याचे आदेश मंत्री छगन भुजबळ यांनी दिले आहे. येवला मतदारसंघात पाणी टंचाईवर मात करण्यासाठी आवश्यक उपाययोजना, वीजपुरवठा आणि पायाभूत सुविधांशी संबंधित विकासकामे पूर्ण करण्याचे निर्देश अन्न, नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री छगन भुजबळ यांनी अधिकाऱ्यांना दिले. येवला मतदारसंघातील दुष्काळी परिस्थितीचा आणि विविध विकासकामांचा मंत्री भुजबळ यांनी आढावा घेतला. यावेळी माजी खासदार समीर भुजबळ, येवला उपविभागीय अधिकारी बाबासाहेब गाढवे, निफाडचे उपविभागीय अधिकारी डॉ. शशिकांत मंगरूळे, पोलीस उपअधीक्षक रोशन पंडितसह वेगवेगळ्या विभागांचे अधिकारी उपस्थित होते. दुष्काळी परिस्थिती लक्षात घेऊन उपलब्ध पाणी काटकसरीने वापरा. पाणी उपलब्ध असलेल्या विहिरी, बोअरवेल आणि अन्य पाणीस्रोतांचे सर्वेक्षण करून गरजेनुसार अधिग्रहणाची कार्यवाही करावी. ग्रामीण भागातील पाणी पुरवठ्याची सद्यस्थिती तपासून संभाव्य टँकर मागणीचा आढावा घ्यावा आणि आवश्यकतेनुसार टँकरद्वारे पाणी पुरवठ्याचे नियोजन करावे. दुष्काळग्रस्त शेतकरी आणि नागरिकांना आवश्यक उपाययोजनांचा लाभ वेळेत मिळण्यासाठी प्रशासनाने कार्यवाही गतिमान ठेवावी, असेही मंत्री भुजबळ यांनी सांगितले. पशुधनासाठी चारा उपलब्धतेच्या दृष्टीने चारा पिकांच्या लागवडीला प्रोत्साहन द्यावे, वनविभागाच्या क्षेत्रात पाण्याची उपलब्धता असलेल्या ठिकाणी नियमानुसार चारा लागवडीची शक्यता तपासावी. तसेच आवश्यक नियम व परवानग्यांच्या अधीन राहून मेंढपाळ आणि चराऊ जनावरांसाठी चाऱ्याची उपलब्धता सुनिश्चित करण्याबाबत कार्यवाही करावी, असे निर्दे श त्यांनी दिले. येवला ३८ गावे, राजापूर ४० गावे, धुळगाव १६ गावे तसेच विंचूर-लासलगावसह १६ गावे प्रादेशिक पाणीपुरवठा योजनांच्या सद्यस्थितीचा आढावा घेण्यात आला. जलजीवन मिशनअंतर्गत सुरू असलेल्या रेट्रोफिटिंगच्या कामांसह प्रलंबित कामे वेळेत पूर्ण करून नागरिकांना नियमित व पुरेसा पाणीपुरवठा उपलब्ध करून देण्याच्या सूचना त्यांनी संबंधित अधिका-यांना दिल्या. येवला व निफाड तालुक्यातील शेती व ग्रामीण भागातील वीजपुरवठ्याचा आढावा घेत नादुरुस्त रोहित्रांची तातडीने दुरुस्ती करून वीजपुरवठा सुरळीत करण्याचे निर्दे शही मंत्री भुजबळ यांनी दिले. यामुळे शेतकरी आणि नागरिकांना होणाऱ्या अडचणी दूर करण्यासाठी संबंधित विभागांनी तत्परतेने कार्यवाही करावी, असे त्यांनी स्पष्ट केले.

### कोजागिरी ..

साजरी कोजागिरी
आमच्या गच्चीवरी
उत्साह उत्सवाचा
जमली गल्ली सारी

को जाग्रत प्रश्नसार्थ
लक्ष्मी माता विचारी
निर्मळता मना यावी
जागरूकताआचारी

शीतल शुभ्र प्रकाश
मने निरामय सारी
विसरला वैर भाव
मलीनता पळे दूरी

दुग्ध शर्कर केशरी
स्वाद पसरे दिगंतरी
हवेत वाटे शिरशिरी
स्नेह दाटला अंतरी

रात्र ही असे जरी
संपू नये वाटे तरी
को जाग्रत आहे रे
सजगता ये परोपरी

नवान्ना पूजन करी
भुमि ऋण उपकारी
पीके यावी भरभरू
विचार ये सुखकारी

कविकल्पना तशीचं
चंद्र सत्य जाणे जरी
पृथ्वी चांद गोड नाते
अबाधित हो अंतरी

– हेमंत मुसरीफ पुणे.
९७३०३०६९९६

### आकाल ..

निवडणूक सुसंपन्न
प्रतिक्षेत ते निकाल
अल्पकाळ सगळेचं
विसरू गेले अकाल

खर्चिक मिरवणूका
उधळा फुले गुलाल
रे काळवंडलेलेचेहरे
होती मग लालेलाल

कोणकसा जिंकला
पुनश्चउठणारंबवाल
पाणी रे आणिबाणी
सुटला नाही सवाल

हरलेले करी आरोप
धन वाटप उलाढाल
किती वेळ टिकणारं
तीचं संकुचित ढाल

चढत जाई महागाई
भाववाढीची धमाल
अन्न धान्य टंचाईची
मर्यादा गाठे कमाल

बळी राजा दबलेला
बेभाव विकतो माल
सामान्यकर्जबाजारी
जणू झालायं हमाल

हरालं किंवाजिंकालं
जबाबदारीने वागालं
परिस्थितीचीजाणीव
जरासेसुखाने जगालं

– हेमंत मुसरीफ पुणे.
९७३०३०६९९६

### दुबार ..

मतदारयादी झळके
दिसे माझेनाव दुबार
कौतुकवाटे बापाला
नाव काढतोयं प्वार

मतदारयादी चांगली
माना तिचेचं आभार
तपासून पहावे नीट
नाव असणारं तिबार

मतदाना मी जाताचं
निराशा पदरात फार
माझ्याआधीच दुसरा
मतदान करून पसार

दहा बाय दहा खोली
भरतोय गच्च दरबार
पन्नास जण राहतात
याच पत्त्या वरी भार

फेमसकेलायं ड्रेस
धन्यवाद देई साभार
अनेक आधार कार्डा
इथे मिळाला आधार

पण्जोबा कसेजीवंत
जन्म घेतात वारंवार
मतदानार्थ पृथ्वीवर
खास घेतात अवतार

मतदार यादीचा हवा
सातत्याने जिर्णोद्धार
मदतीसएसआयआर
जागरुक हवे मतदार

– हेमंत मुसरीफ पुणे.
९७३०३०६९९६

पान ४ वरुनं

### कर्णकर्कश आवाज करणाऱ्या

त्रास सहन करावा लागतो. विशेषतः लहान बालके, ज्येष्ठ नागरिक आणि आजारी रुग्णांसाठी हा आवाज त्रासदायक ठरत असल्याने नागरिकांमधूनही अशा वाहनांवर कारवाई करण्याची मागणी होत असते. या पार्श्वभूमीवर शहर वाहतूक शाखेने अशा वाहनांविरुद्ध कारवाई सुरू केली आहे. नियमबाह्य पद्धतीने सायलेन्सर मॉडिफाय करून कर्णकर्कश आवाज करणाऱ्या बुलेट आढळून आल्यास संबंधित वाहनचालकांवर दंडात्मक कारवाई करण्यात येणार असून, नियमानुसार अशा वाहनांचे मॉडिफाइड सायलेन्सर जप्त करण्याची कारवाईही केली जाणार आहे. यावेळी माध्यमांशी बोलताना शहर वाहतूक शाखेचे पोलीस निरीक्षक सुरेश उनवणे यांनी वाहनचालकांना वाहतुकीचे नियम पाळण्याचे आवाहन केले. वाहनांमध्ये अनधिकृत बदल करून मोठ्या आवाजाचे सायलेन्सर बसवू नयेत. नागरिकांना त्रास होईल, अशा प्रकारे वाहने चालविणे टाळावे. नियमांचे उल्लंघन करणाऱ्या वाहनचालकांची गय केली जाणार नाही, असा इशाराही त्यांनी दिला.

### घनसावंगी इथे भारत सरकारच्या

आहे तरी या सुवर्ण संधी चा लाभ जास्तीत जास्त सुशिक्षित तरुणांनी घ्यावा. भरती साठी :पात्रता ✲१)शिक्षण :युवक हा कमीत कमी १0 वी पास असावा. २)वय:किमान १९ वर्ष ते कमाल ४५ वर्ष. ३) उंची:१६५सेमी पेक्षा जास्त. ४)वजन ४८किलो पेक्षा जास्त. युवक हा शारीरिक आणि मानसिक फिट असावा. भरतीसाठी कागदपत्रे:१)आधार कार्ड झेरॉक्स २) ,१0/१२वी /ग्रॅज्युशन चे मार्कशीट पैकी १ झेरॉक्स. ३) पासपोर्ट साईझ २ फोटो घेऊन येणे.४)रेजिस्ट्रेशन फी ५00रुपये (फक्त निवड होणाऱ्या युवकांसाठी ) घेऊन यावे, भर्ती प्रक्रिया सकाळी ८ ते दुपारी १ पर्यन्त दररोज सुरु राहिल,या भरतीचा जास्तीत जास्त युवकांनी लाभ घ्यावा असे आवाहन श्री. जयमंगल जाधव, मा. जि. प. सदस्य, समन्वयक राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी, विधानसभा घनसावंगी, तसेच भरती अधिकारी .श्री महेशकुमार सरतापे, श्री गोरख जगताप यांनी केले आहे ✲अधिक माहिती करिता संपर्क :९५५२२३८0५७/ ९२८४१२५१00

### रांजणी येथे जुगार क्लबवर पोलिसांची

संतोष सोपान जाधव आणि ज्ञानेश्वर प्रेम राठोड (सर्व रा. रांजणी, ता. घनसावंगी, जि. जालना) यांची नावे नमूद करण्यात आली आहेत. जुगार क्लबच्या शेतजमीन जागेच्या मालकाचे नाव भारत राव देशपांडे (रा. रांजणी, ता. घनसावंगी, जि. जालना) असे प्रसिद्धीपत्रकात नमूद आहे. रोख रकमेसह दुचाकी जप्त या कारवाईत जप्त करण्यात आलेल्या मुद्देमालामध्ये रोख रक्कम, चार मोबाईल फोन आणि सात दुचाकींचा समावेश आहे. या सर्व मुद्देमालाची एकूण किंमत ३ लाख १0 हजार ११0 रुपये असल्याचे पोलिसांनी सांगितले आहे. पोलीस अधीक्षकांच्या मार्गदर्शनाखाली कारवाई ही कारवाई जालना जिल्ह्याचे पोलीस अधीक्षक तेघबीरसिंग संधू यांच्या मार्गदर्शनाखाली विशेष पथकाने केली. या पथकात सपोनि अविनाश गडाख, पोउपनि दिनेश बर्डे, पोहेकॉ सचिन कोकणे, मेघा बोराडे, नंदकिशोर जैवाल, हरबक, शेजुळ आणि हाळदे यांच्यासह अन्य कर्मचाऱ्यांचा सहभाग होता. जिल्ह्यातील अवैध जुगार व इतर बेकायदेशीर धंद्यांविरोधात पोलिसांनी कारवाईचा बडगा उगारला असून, अशा प्रकारांना आळा घालण्यासाठी पोलिसांची मोहीम सुरू असल्याचे या कारवाईतून स्पष्ट होत आहे.

पान ४ वरुन

### कर्जमुक्तीची चौथी यादी

पान ४ वरुन

कुठे पाहता येईल? सदर लाभार्थी यादी बँक शाखा, विकास संस्था (वि. का. संस्था), ग्रामपंचायत कार्यालय आणि संबंधित गावाच्या गाव चावडीवर प्रसिद्ध करण्यात आली आहे. आधार प्रमाणीकरण प्रक्रिया: यादीतील शेतकऱ्यांनी आपला विशिष्ट क्रमांक, आधार कार्ड तसेच बँकेचे पासबुक घेऊन नजीकच्या आपले सरकार सेवा केंद्र किंवा बँक शाखेत जाऊन लवकरात लवकर आधार प्रमाणीकरण करून घ्यावे. कोणतेही शुल्क नाही: आपले सरकार सेवा केंद्र चालकाने आधार प्रमाणीकरण करण्यासाठी शेतकऱ्यांकडून कोणतेही शुल्क घेण्याची आवश्यकता नाही. तक्रार नोंदणी: आधार क्रमांक, बँक खाते क्रमांक किंवा कर्जाची रक्कम चुकीची असल्यास
बोटाचे ठसे उमटत नसल्यास तहसिलदारांकडे ऑनलाईन तक्रार नोंदवावी. यादीतील जे शेतकरी मयत आहेत, त्यांच्या वारसांनी संबंधित बँक शाक्रियेशी संपर्क साधून आवश्यक कागदपत्रांद्वारे कर्जखात्यावर वारसाचे नाव नोंदवून घ्यावे. जालना जिल्ह्यातील पात्र शेतकऱ्यांनी आपली नावे संबंधित ठिकाणी तपासून घ्यावीत आणि नजीकच्या आपले सरकार सेवा केंद्र किंवा बँकेत जाऊन मोफत आधार प्रमाणीकरण करून सहकार्य करावे, असे आवाहन श्री. परमेश्वर वरखडे, प्र. जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, जालना यांनी केले आहे.

## १३७ किलो प्लास्टिक गोळा

अनावश्यक वापर टाळणे, वापरलेले प्लास्टिक योग्य ठिकाणी जमा करणे आणि सार्वजनिक ठिकाणांची स्वच्छता राखणे, या सवयी समाजात रुजणे गरजेचे आहे. या स्वच्छता मोहिमेत मुलींनी प्रत्यक्ष सहभाग घेत जवळपास १३७ किलो प्लास्टिक कचरा गोळा केला. गोळा केलेले संपूर्ण प्लास्टिक रोटरीच्या जागतिक अनुदान उपक्रमांतर्गत उपलब्ध झालेल्या यंत्राच्या माध्यमातून पुनर्प्रक्रियेसाठी पाठविण्यात आले. त्यामुळे संकलित कचऱ्याची योग्य विल्हेवाट लावण्याबरोबरच प्लास्टिकचा पुनर्वापर आणि पुनर्प्रक्रिया यांचे महत्त्वही अधोरेखित झाले. प्लास्टिक कचरा उघड्यावर टाकल्याने परिसर अस्वच्छ होतो. नाल्यांमध्ये प्लास्टिक साचल्यास पाण्याच्या प्रवाहात अडथळे निर्माण होऊ शकतात. तसेच पर्यावरणावरही त्याचा विपरीत परिणाम होतो. त्यामुळे प्लास्टिकचा वापर कमी करणे, कचऱ्याचे योग्य वर्गीकरण करणे आणि पुनर्प्रक्रियेला प्रोत्साहन देणे ही काळाची गरज आहे. या मोहिमेने या बाबींचे महत्त्व प्रत्यक्ष कृतीतून दाखवून दिले. या मोहिमेतील सर्वांत महत्त्वाची बाब म्हणजे मुलींमध्ये निर्माण झालेली स्वच्छतेविषयीची जाणीव. कचरा गोळा करण्याचा अनुभव घेतल्यानंतर पुढील वेळी यात्रेला गेल्यावर कचरा होणार नाही, याची काळजी घेऊ आणि प्लास्टिकचा वापर टाळण्याचा प्रयत्न करू, अशी भावना मुलींनी व्यक्त केली. हीच या उपक्रमाची खरी फलश्रुती म्हणावी लागेल. कारण कचरा उचलणे हा तात्कालिक उपाय असला, तरी कचरा होऊ न देण्याची सवय लावणे हा कायमस्वरूपी बदलाचा मार्ग आहे. आज या मुलींमध्ये निर्माण झालेली जाणीव त्यांच्या कुटुंबांपर्यंत पोहोचू शकते आणि त्यातून घराघरांत स्वच्छता व पर्यावरण रक्षणाचा संदेश रुजू शकतो. या मोहिमेत रोटरी क्लब ऑफ जालना इलाईटचे शरद गाडिया, रवींद्र हुसे, अंबिका सैबी, सुवर्णा राऊत, नीता वझरकर आणि विनोद देशमुख यांच्यासह संबंधित सदस्यांचा सहभाग होता. रोटरी क्लब ऑफ जालना इलाईट आणि इंटरॅक्ट क्लब ऑफ जालना इलाईट स्पार्कल यांच्या संयुक्त प्रयत्नातून राबविण्यात आलेल्या या उपक्रमाने स्वच्छता, पर्यावरण संवर्धन आणि सामाजिक जबाबदारी यांचा सुंदर संगम घडवून आणला. 'माझा कचरा, माझी जबाबदारी' हा संदेश प्रत्यक्ष कृतीतून अधोरेखित करणारी ही मोहीम शहरातील नागरिकांसाठी प्रेरणादायी ठरली.

# दिवाळीत फटाके फोडताना सावधान !

मुंबई : दिवाळी सणाच्या पार्श्वभूमीवर फटाक्यांची विक्री आणि आतषबाजीसंदर्भात पोलिस प्रशासनाकडून नियमावली जाहीर करण्यात आली आहे. सार्वजनिक ठिकाणे, रस्ते, पदपथ आणि गल्ल्यांमध्ये फटाके फोडण्यावर निर्बंध घालण्यात आले असून, नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर कायदेशीर कारवाई करण्याचा इशारा देण्यात आला आहे. तसेच फटाक्यांच्या आवाजावर मर्यादा, संवेदनशील ठिकाणांपासूनचे अंतर आणि तात्पुरत्या विक्री परवान्यांच्या कालावधीबाबतही महत्त्वाच्या सूचना देण्यात आल्या आहेत. त्यामुळे दिवाळीत फटाके खरेदी करण्यापूर्वी आणि फोडण्यापूर्वी नागरिकांनी नियमांची माहिती घेणे आवश्यक आहे. कुठे फटाके फोडण्यास बंदी ?
दिवाळीच्या काळात ध्वनी आणि वायुप्रदूषण कमी करण्यासाठी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ (चझउइ) आणि मुंबई महापालिकेकडून नागरिकांना नियमांचे पालन करण्याचे आवाहन करण्यात आले आहे. न्यायालयाच्या निर्देशांनुसार फटाक्यांच्या वापरावर विविध निर्बंध लागू आहेत. – रस्ते आणि सार्वजनिक ठिकाणे: रस्ते, पदपथ, गल्लूया आणि रस्त्यापासून १० मीटरच्या आत फटाके फोडण्यास मनाई असल्याचे नियमावलीत नमूद आहे. संवेदनशील ठिकाणे: रुग्णालये, शैक्षणिक संस्था, सरकारी कार्यालये आणि न्यायालयांपासून १०० मीटरच्या परिसरात फटाके फोडण्यावर निर्बंध आहेत. रात्रीच्या वेळेची मर्यादा: रात्री १० ते सकाळी ६ या वेळेत आवाज करणारे फटाके फोडण्यास बंदी आहे. – लेझर आणि बीम लाइट्स: सण-समारंभ आणि मिरवणुकांमध्ये तीव्र प्रकाशाचे दिवे, लेझर आणि बीम लाइट्सच्या वापरावरही निर्बंध घालण्यात आले आहेत. नियमांचे उल्लंघन केल्यास संबंधित व्यक्तींवर लागू कायद्यांनुसार कारवाई केली जाऊ शकते. त्यामुळे नागरिकांनी फटाके फोडताना निर्धारित वेळ, जागा आणि ध्वनीमर्यादांचे पालन करणे गरजेचे आहे. ध्वनीप्रदूषण रोखण्यासाठी विशेष उपाययोजना सण-समारंभांदरम्यान ध्वनीची पातळी निर्धारित मर्यादेत राहावी, यासाठी ध्वनी मोजणाऱ्या उपकरणांच्या वापराबाबतही निर्देश देण्यात आले आहेत. खासगी जागांमध्ये आयोजित कार्यक्रमांनाही लागू ध्वनीमर्यादांचे पालन करावे लागणार आहे. नागरिकांनी निर्धारित वेळेत कमी प्रदूषण करणाऱ्या ग्रीन फटाक्यांचा वापर करावा, असे आवाहन करण्यात आले आहे. मात्र, ग्रीन फटाक्यांमध्येही विषारी जड धातू आढळत असल्याचा दावा आवाज फाउंडेशनने केला असून, सर्व प्रकारच्या फटाक्यांवर बंदी घालण्याची मागणी केली आहे. दरम्यान, न्यायालयाच्या निर्दे शांची अंमलबजावणी करण्यात अपयश आल्याबद्दल हायकोर्टाने प्रशासनावर नाराजी व्यक्त केली आहे. निर्बंधांची माहिती नसल्याचे काही पोलीस अधिकाऱ्यांनी सांगितल्याची न्यायालयाची नोंद न्यायलयाने घेतली आहे. या पार्श्वभूमीवर २६ ऑक्टोबर रोजी मुंबई महापालिका, चझउइ आणि पोलीस प्रमुखांना हायकोर्टात हजर राहण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

पान १ वरून...

### आरोप- प्रत्यारोप नको,

मदत त्या त्या भागात पोहोचली असून ती थेट गरजू शेतकरी कुटुंबांपर्यंत पोहचवणे हे शिवसैनिकांचे कर्तव्य असल्याचे आवाहन उपमुख्यमंत्र्यांनी कार्यकर्त्यांना केले आहे. याशिवाय, राज्य सरकारकडून जाहीर होणारी मदत प्रत्यक्षात प्रत्येक गरजू शेतकऱ्यापर्यंत पोहोचते की नाही, याची कार्यकर्त्यांनी प्रत्यक्ष पाहणी करावी असेही शिंदे यांनी सांगितले आहे. शासकीय मदतीसाठी लागणारे अर्ज भरण्यापासून ते पंचनाम्यांच्या प्रक्रियेपर्यंत सर्व प्रशासकीय कामांत शिवसैनिकांनी शेतकऱ्यांना मदत करावी असे आवाहन शिंदे यांनी पक्ष पदाधिकाऱ्यांना केले आहे. आपल्या दसरा मेळाव्यातील भाषणात उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी यंदाची बळीराजाची दिवाळी अंधारात जाऊ देणार नाही, असा शब्द राज्यातील जनतेला दिला होता. हा शब्द पाळण्यासाठी सर्वांनी एकदिलाने काम करावे असे आवाहन शिंदे यांनी शिवसेनेचे सर्व मंत्री, आमदार आणि कार्यकर्त्यांना केले आहे.

### सौर ऊर्जा प्रकल्पाच्या माध्यमातून

पशुसंवर्धन विभागातील सर्व इमारतींचे वीज बिल शून्यावर आणून अतिरिक्त वीज निर्मिती करून त्या विक्रीतून विभागाचे उत्पन्न वाढवण्यासाठी हा सामंजस्य करार महत्वाचा ठरणार आहे. महात्मा फुले मागासवर्गीय विकास महामंडळाची उपकंपनी महात्मा फुले रिन्युएबल एनर्जी अँड इन्फ्रास्ट्रक्चर टेक्नॉलॉजी लिमिटेडने (महाप्रीत) पशुसंवर्धन विभागाच्या जागांवर सौरऊर्जा प्रकल्प कार्यान्वित करण्यास स्वारस्य दर्शविले आहे. कंपनीने पशुसंवर्धन मंत्री पंकजा मुंडे यांच्या समोर याबाबत सादरीकरण केले. विस्तृत प्रकल्प अहवाल तयार करण्यासाठी इमारतींच्या छतांवरील जागेची उपलब्धता, प्रक्षेत्रांचे स्थळ सर्वेक्षण आणि व्यवहार्यता अभ्यास केला जाणार आहे. विस्तृत प्रकल्प अहवाल सादर झाल्यानंतर पहिल्या टप्प्यात आयुक्त पशुसंवर्धन कार्यालय परिसरातील कार्यालयीन इमारतींच्या छतांवर तसेच साकूड, (ता. अंबेजोगाई, जि. बीड) येथील महाराष्ट्र पशुधन विकास मंडळाच्या अधिपत्याखालील प्रक्षेत्रावर प्रायोगिक तत्त्वावर सौरऊर्जा प्रकल्प राबविण्यात येणार असल्याची माहिती देण्यात आली.

### दक्षता जनजागृती सप्ताह

करताना, भ्रष्टाचारात गुंतलेला आढळल्यास त्वरित लाचलुचपत प्रतिबंधक, बृहन्मुंबई विभाग, ९१, सर पोचखानवाला मार्ग, वरळी, मुंबई येथे संपर्क करावा. तसेच टोल फ्री क्रमांक १०६४, दूरध्वनी क्रमांक ०२२-२४९२१२१२,२४९२२६१८, संकेतस्थळ र्हीींि://रलल.ारहरीरिहीीर.सीं.ळप, ईमेल रललुशलारळश्रारहर्रेश्रिळलश.सीं.ळप, रववश्रलरलिलर्ीीलरळ ारहर्रेश्रिळलश.सीं.ळप आणि ८८२८२४१०६४ या व्हॉट्सप क्रमांकावर संपर्क साधावा, असे आवाहन संदीप दिवाण, अपर पोलीस आयुक्त, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई यांनी केले आहे.

### भोकरदनमध्ये अवैध

वाडी, ता. भोकरदन, जि. जालना) असे कारवाई करण्यात आलेल्या तरुणाचे नाव आहे. जालना जिल्ह्यात अवैध शस्त्रे बाळगणाऱ्यांचा शोध घेऊन त्यांच्यावर कारवाई करण्याच्या सूचना पोलीस अधीक्षक तेजबीरसिंह संधू यांनी स्थानिक गुन्हे शाखेला दिल्या होत्या. त्यानुसार पोलीस निरीक्षक पंकज जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली पथकाने अवैध शस्त्र बाळगणाऱ्यांचा शोध सुरू केला होता. दरम्यान, २३ ऑक्टोबर रोजी अवैध शस्त्र बाळगणाऱ्यांचा शोध घेत असताना अभिषेक राऊत याच्याकडे तलवार असल्याची माहिती पोलिसांना मिळाली. पथकाने त्याचा शोध घेऊन चौकशी केली असता, तलवार आपल्या घरात



आज दुपारी ढगाळ वातावरण झाले होते व थोरात पाऊस पडला अजूनही वातावरणात बदल दिसून येत आहे.
छायाचित्र किरण खानापुरे

# कर्णकर्कश आवाज करणाऱ्या मॉडिफाइड बुलेटवर पोलिसांचा दणका



जालना/प्रतिनिधी : जालना शहरात मॉडिफाइड सायलेन्सर लावून कर्णकर्कश आवाज करणाऱ्या बुलेट वाहनचालकांविरुद्ध शहर वाहतूक शाखेने दंडात्मक कारवाईचा बडगा उगारला आहे. शहरातील गांधी चमन परिसरात पोलिसांनी विशेष कारवाई करत सात ते आठ बुलेट वाहनांवर कारवाई केली आहे. नियमांचे उल्लंघन करून मोठ्या आवाजात वाहन चालविणाऱ्यांविरुद्ध ही मोहीम यापुढेही सातत्याने सुरू राहणार असल्याची माहिती शहर वाहतूक शाखेचे पोलीस निरीक्षक सुरेश उनवणे यांनी दिली. अनेक बुलेटधारक आपल्या वाहनांचे मूळ सायलेन्सर बदलून मॉडिफाइड सायलेन्सर बसवतात. त्यामुळे वाहनातून मोठ्या प्रमाणात कर्णकर्कश आवाज निर्माण होतो. अशा आवाजामुळे रस्त्यावरील इतर वाहनचालकांसह परिसरातील नागरिकांनाही (पान ३ वर)

# मुख्यमंत्री पशुधन उद्योजकता विकास कार्यशाळेला भोकरदन येथे उत्स्फूर्त प्रतिसाद



भोकरदन/प्रतिनिधी : मुख्यमंत्री पशुधन उद्योजकता विकास प्रशिक्षण कार्यक्रमास भोकरदन येथे उत्साहात प्रारंभ झाला असून पशुपालक महिलांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती. स्वावलंबी शाश्वत उद्योजकता विकास अभियान महाराष्ट्र अंतर्गत युवाशक्ती बिजनेस सोल्युशन जालना संकल्प ग्लोबल फाउंडेशन व धरती धन ग्रामविकास संस्थेच्या संयुक्त सहकार्याने आयोजित करण्यात आलेल्या पाच दिवसीय प्रशिक्षण कार्यक्रमासाठी उद्घाटक म्हणून युवाशक्ती बिझनेस सोल्युशन चे अमोल खरात होते तर प्रमुख अतिथी म्हणून राष्ट्रवादी चे जिल्हा उपाध्यक्ष मदनराव तुपे स्वावलंबी शाश्वत उद्योजकता विकास अभियानाचे मिलिंद सावंत, कामगार सेनेचे शंकर बुजाडे आधार संस्थेचे सुरेश सपाटे सलीम शेख शामराव दांडगे यांची प्रमुख उसे उपस्थिती होती. या कार्यक्रमात त मुख्यमंत्री पशुधन उद्योजकता योजनेअंतर्गत शेळी मेंढी पालन दुग्ध व्यवसाय व्यवस्थापन गाय महेश पालन कुक्कुटपालन पशुखाद्य निर्मिती इत्यादी घटकांसाठी सर्वसाधारण प्रवर्गासाठी ५० टक्के अनुदान असून अनुसूचित जाती जमातीतील लाभार्थ्यांना ७५ टक्के पर्यंत अनुदान असल्याचे सांगण्यात आले. शासन निर्णयातील अटीनुसार सर्व पशुपालकांना प्रशिक्षण प्रमाणपत्र घेणे आवश्यक असल्याने या पाच दिवशी प्रशिक्षणाचा लाभ सर्व तालुक्यातील लाभार्थ्यांनी घ्यावा असे आवाहन सेवानिवृत्त पशुवैद्यकीय अधिकारी डॉक्टर सचिन निर्मळ यांनी केले शासकीय योजनांचा लाभ घेण्यासाठी मोठ्या संख्येने पशुपालकांनी पुढाकार घ्यावा असे आवाहन मिलिंद सावंत यांनी केले तर अमोल खरात यांना लाभार्थ्यांनी कागदोपत्री पूर्तता करण्यासाठी व योजनेचा लाभ घेण्यासाठी प्रशिक्षण घेऊन स्वयंरोजगार उभारणीसाठी आवश्यक ते सहकार्य करण्यासाठी युवाशक्तीच्या माध्यमातून प्रयत्न केले जाईल असे सांगितले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शंकर भुजाडे यांनी तर आभार प्रदर्शन सुरेश पाटील यांनी मानले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी ज्ञानेश्वर पाटील श्रीमती नंदा काळे अनुराधा लोखंडे यांच्यासह स्वावलंबी शाश्वत उद्योजकता विकास अभियान युवाशक्ती बिजनेस सोल्युशनच्या पदाधिकाऱ्यांनी विशेष परिश्रम घेतले.

# सिंदखेड फाटा येथे पेट्रोल पंपाजवळ दुचाकीने घेतला पेट; जीवितहानी टळली



किशोर मोरे / घनसावंगी : तालुक्यातील सिंदखेड फाटा येथे पेट्रोल पंपाजवळ एका दुचाकीने अचानक पेट घेतल्याची घटना घडली. या घटनेमुळे परिसरात काही काळ खळबळ उडाली. सुदैवाने या घटनेत कोणतीही जीवितहानी झाली नाही.
मिळालेल्या माहितीनुसार, सिंदखेड फाटा येथील पेट्रोल पंपाजवळ दुचाकीला अचानक आग लागली. दुचाकीने पेट घेतल्याचे लक्षात येताच परिसरातील नागरिकांचे लक्ष घटनास्थळाकडे वेधले गेले. पेट्रोल पंपाजवळ ही घटना घडल्याने नागरिकांमध्ये काही काळ चिंतेचे वातावरण निर्माण झाले.
सुदैवाने या घटनेत कोणतीही जीवितहानी झाली नसल्याने मोठा अनर्थ टळला. मात्र, दुचाकीला नेमक्या कोणत्या कारणामुळे आग लागली, याबाबत अद्याप स्पष्ट माहिती मिळालेली नाही.
सिंदखेड फाटा येथे घडलेल्या या घटनेमुळे वाहनांच्या सुरक्षिततेचा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे.
वाहनचालकांनी आपल्या वाहनांची नियमित तपासणी करावी, असे आवाहन या घटनेच्या पार्श्वभूमीवर करण्यात येत आहे.
या घटनेत जीवितहानी झाली नसली, तरी पेट्रोल पंपाजवळ दुचाकीने पेट घेतल्याने परिसरात चर्चेला उधाण आले आहे.

# नवरात्रीनिमित्त 'लेडीज ॲव्होकेट क्रिकेट २०२६' स्पर्धा संपन्न; रोमांचक सामन्यात 'दांडिया रायडर्स इलेव्हन' विजयी!



जालना / प्रतिनिधी : शहरातील सीपी क्रिकेट ग्राउंड येथे नवरात्रोत्सवाचे औचित्य साधून 'महिला वकील संघ, जालना' यांच्या वतीने 'लेडीज ॲव्होकेट क्रिकेट २०२६' या भव्य क्रिकेट सामन्याचे आयोजन करण्यात आले होते. या अत्यंत चुरशीच्या आणि रोमांचक ठरलेल्या सामन्यात 'दांडिया रायडर्स इलेव्हन' संघाने उत्कृष्ट कामगिरी करत 'गरबा क्वीन इलेव्हन' संघावर मात करून विजेतेपद पटकावले.सामन्याची सुरुवात शुक्रवारी (दि. २३ ऑक्टोबर) दुपारी ठीक ४:00 वाजता झाली. प्रमुख पाहुणे प्रा. प्रतीक भक्त (मुख्य, सीपी क्रिकेट क्लब), ॲड विष्णू नाईक,ॲड. सौरभ नाईक, ॲड. मारोती आटोळे आणि ॲड अरविंद मुरमे यांच्या प्रमुख उपस्थितीत आणि मार्गदर्शनाखाली सामन्याचे थाटात उद्घाटन ॲड विष्णू नाईक यांच्या हस्ते करण्यात आले.
'खेळ आमचा... जिंकण्याचा ध्यास आमचा!' या घोषणा देत दोन्ही संघातील महिला वकिलांनी मैदानावर आपला कस लावला.
कर्णधार ॲड. कल्पना त्रिभुवन यांच्या नेतृत्वाखाली 'दांडिया रायडर्स इलेव्हन' संघाने फलंदाजी आणि गोलंदाजी या दोन्ही आघाड्यांवर जबरदस्त प्रदर्शन केले. संघ विजयी करण्यासाठी सविता भास्करे, दुर्गा वझूरकर, शारजा शेख, सीमा कवडे, प्रिती हिवाळे, शितल मंत्री, कृपाली गायकवाड, अंकिता लोहिया, शशिकला चाव्हरे, आंचल वैवारे आणि पल्लवी लांडगे यांनी अष्टपैलू योगदान दिले.
दुसऱ्या बाजूने 'गरबा क्वीन इलेव्हन' संघाची कर्णधार ॲड. भाग्यश्री कुलकर्णी यांच्या नेतृत्वाखालील संघानेही दांडिया रायडर्सला जोरदार टक्कर दिली.मनोरमा महालकर, आशा पटेकर, सरिता गजरे, सीमा मगर, ऐश्वर्या दुसाने, प्रतिक्षा राठी, स्वाती कवडे, अर्चना हिवाळे, रेखा कांबळे आणि झीनत शाह यांनी शेवटच्या क्षणापर्यंत सामना जिंकण्यासाठी शर्थीचे प्रयत्न केले. मात्र, अखेर दांडिया रायडर्स संघाने बाजी मारली.हा सामना यशस्वी करण्यासाठी आयोजन समितीच्या ॲड. कल्पना त्रिभुवन, ॲड. मनोरमा महालकर, ॲड. सविता भास्करे, ॲड. स्वाती कवडे यांच्यासह हितचिंतक ॲड. विनोद पांडव, ॲड. श्रीराम हुसे, ॲड अमजद पठाण, ॲड समी खान, ॲड परिहार,ॲड दिनेश खरात, ॲड परमेश्वर वरपे,ॲड चव्हाण,ॲड अमोल पांडे,यांनी विशेष परिश्रम घेतले. सामना पाहण्यासाठी जालना शहर व परिसरातील विधीज्ञ आणि क्रीडाप्रेमी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# घनसावंगी इथे भारत सरकारच्या पसारा कायद्या अंतर्गत सुरक्षा रक्षक, पदासाठी कायदेशीर भरती प्रक्रिया सुरु



घनसांवगी / प्रतिनिधी : सुरक्षा डिपार्टमेंट मधे ६0 वर्षा पर्यंत परमैनेंट नौकरी ची सुवर्ण संधी,भारत सरकारच्या सूक्ष्म लघु मंत्रालय उपक्रमांतर्गत आणि भारत सरकारच्या पसारा कायदा २००५ च्या नियमाप्रमाणे स्थानिक सुशिक्षित तरुणांसाठी कायमस्वरूपी नोकरीसाठी आयएसओ मानांकनप्राप्त , एस एस सिक्योरिटी प्रा.लिमिटेड आणि राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी . (अजितदादा ) घनसावंगी. ता. घनसावंगी.जि. जालना यांच्या संयुक्त विद्यमाने,दिनांक २७ऑक्टोबर २०२६ ते ३0ऑक्टोबर २०२६ पर्यंत सुरक्षा रक्षक भरतीचे आयोजन करण्यात आले आहे.
भरतीस बेरोजगार युवकांना पर्मनंट नोकरीं दिली जाणार आहे. त्याचबरोबर. सरकारी सुविधा ज्यामध्ये पी एफ सुविधा,सरकारी एड्खउ द्वारे सम्पूर्ण परिवरास मेडिकल, ग्रॅजुटी, पी एफ पेन्शन, विधवा पेन्शन, अनाथ पेन्शन व नियमानुसार भत्ते दिले जातील, तसेच पेमेंट हे महाराष्ट्र गार्ड बोर्ड किंवा महाराष्ट्र किमान वेतन नियमाप्रमाणे मिळणार आहे जे १६ हजार ते २४हजार मिळेल, व सर्व सूविधा दिल्या जातील. भरती होणाऱ्या तरूणांना पुणे विभाग, छ. संभाजी नगर विभाग, अहिंल्यानगर विभाग मधेच नौकरी दिली जाणार आहे,
ही भरती प्रक्रिया दि.२७ ऑक्टोबर ते ३0ऑक्टोबर २०२६ पर्यंत सकाळी ८ ते दुपारी१ पर्यंत नृसिंह मंगल कार्यालय, अंबड पाथ्री रोड, संत रामदास कॉलेज समोर, घनसावंगी.ता. घनसावंगी जिल्हा. जालना येथे सुरू राहणार (पान ३ वर)

# रांजणी येथे जुगार क्लबवर पोलिसांची धडक कारवाई; ३ लाख १० हजार ११० रुपयांचा मुद्देमाल जप्त

जालना, प्रतिनिधी : घनसावंगी तालुक्यातील रांजणी येथे सुरू असलेल्या जुगार क्लबवर जालना पोलीस अधीक्षकांच्या विशेष पथकाने धडक कारवाई केली. या कारवाईत रोख रक्कम, चार मोबाईल फोन आणि सात दुचाकी असा एकूण ३ लाख १० हजार ११० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. या प्रकरणात सात जणांची नावे पोलिसांच्या प्रसिद्धीपत्रकात नमूद करण्यात आली आहेत. जालना जिल्ह्यात अवैध धंद्यांविरोधात पोलिसांकडून कारवाई सुरू असतानाच रांजणी येथील जुगार क्लबवर ही कारवाई करण्यात आली. घनसावंगी पोलीस ठाण्याच्या हद्दीत झालेल्या या कारवाईमुळे परिसरातील अवैध जुगार व्यवसायाचा मुद्दा पुन्हा ऐरणीवर आला आहे. सात जणांची नावे प्रसिद्धीपत्रकात पोलिसांच्या प्रसिद्धीपत्रकानुसार, या प्रकरणात केसर सिकंदर पठाण, सलीम रहीम शेख, शाहेरुख अशफाक बागवान, अफरोज मसरत शेख, मुकीद रशीद शेख, (पान ३ वर)

## सखाराम शिंदे यांचे निधन



जालना : तालुक्यातील बावणे पांगरी गावाचे माजी सरपंच सखाराम तुकाराम शिंदे (८५) ययांचे मंगळवारी निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर गावातच अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात दोन मुले, एक मुलगी, सुना, नातवंडे असा परिवार आहे. ते भानुदास आणि कृष्णा शिंदे यांचे वडील होत.

# कर्जमुक्तीची चौथी यादी प्रसिद्ध

जालना : प्रतिनिधी : महाराष्ट्र शासनाच्या 'पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना-२०२६' अंतर्गत जालना जिल्ह्यातील एकापेक्षा जास्त बँकांमध्ये कर्ज खाती असलेल्या आणि २.00 लाखापेक्षा कमी थकबाकी असलेल्या पात्र शेतकऱ्यांची आधार प्रमाणीकरणासाठीची चौथी यादी आज दि. २२/१०/२०२६ रोजी अधिकृतपणे प्रसिद्ध करण्यात आली आहे. प्रमुख ठळक मुद्दे व आकडेवारी चौथ्या यादीतील लाभार्थी: चौथ्या यादीमध्ये राष्ट्रीयीकृत, व्यापारी, खाजगी, ग्रामीण बँक तसेच जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या ७३१ गावांमधील ५,३७८ शेतकऱ्यांसह एकूण १२,९२६ पात्र शेतकऱ्यांचा समावेश आहे. आतापर्यंतची एकूण यादी: पहिल्या यादीमध्ये १०६०४७, दुसऱ्या यादीमध्ये ३२0२0, तिसऱ्या यादीमध्ये २२९३५ आणि चौथ्या यादीमधील १२९२६ असे मिळून जालना जिल्ह्यातील एकूण १,७३,९२८ पात्र शेतकऱ्यांची नावे आतापर्यंत प्रसिद्ध करण्यात आली आहेत. योजनेचे स्वरूप: या योजनेतंर्गत दि. ०१/०४/२०१९ ते ३१/०३/२०२५ या कालावधीत वितरित झालेल्या आणि थकित/परतफेड न झालेल्या पीक कर्ज व पुनर्गठित कर्जास रुपये दोन लाखापर्यंत कर्जमुक्तीचा लाभ दिला जात आहे. शेतकऱ्यांसाठी( खघण ) महत्त्वाच्या सूचना यादी

# सरसेनानी आनंदराज आंबेडकर व ॲड. अमन आंबेडकर यांचे साळेगाव फाट्यावर स्वागत!



जालना प्रतिनिधी : रिपब्लिकन सेनेचे सरसेनानी आनंदराज आंबेडकर व ॲड. मा. अमन आनंदराज आंबेडकर साहेब हे नांदेड दौऱ्यावर जात असताना जालना-मंठा रोडवरील साळेगाव घारे फाट्यावर साळेगाव येथील महिला भगिनींच्या वतीने त्यांचे उत्साहात स्वागत व सत्कार करण्यात आला. यावेळी महिला भगिनींनी साहेबांना शाल व पुष्पहार अर्पण करून त्यांच्याप्रति आदर व्यक्त केला. या स्वागतामुळे परिसरात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले होते. या दौऱ्यादरम्यान साहेबांसोबत रिपब्लिकन सेनेचे महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष मा. डॉ. सुशीलकुमार सूर्यवंशी सर तसेच रिपब्लिकन युवा सेनेचे मराठवाडा अध्यक्ष आयु. दिनेश भाऊ आदमाने उपस्थित होते. साळेगाव फाट्यावर स्वागतप्रसंगी रिपब्लिकन सेनेचे माजी जिल्हा महासचिव आयु. समाधान खरात सर, माजी जिल्हा सचिव नवनाथ ठोके, राहुल म्हस्के,कार्यकर्ते विजय आढाव तसेच साळेगाव येथील महिला भगिनी व कार्यकर्ते उपस्थित होते. या स्वागत सोहळ्यातून रिपब्लिकन सेनेप्रति असलेला आदर, जिव्हाळा आणि सामाजिक एकतेची भावना प्रकर्षाने दिसून आली.

# १३७ किलो प्लास्टिक गोळा करत चिमुकल्या मुलींनी दिला पर्यावरण संवर्धनाचा अनोखा संदेश!



जालना (प्रतिनिधी) : स्वच्छता ही केवळ प्रशासनाची जबाबदारी नसून प्रत्येक नागरिकाचे कर्तव्य आहे, हा संदेश केवळ शब्दांतून नव्हे, तर प्रत्यक्ष कृतीतून देत रोटरी क्लब ऑफ जालना इलाईट आणि इंटरॅक्ट क्लब ऑफ जालना इलाईट स्पार्कल यांच्या वतीने स्तुत्य स्वच्छता मोहीम राबविण्यात आली. नवरात्रोत्सवानिमित्त दुर्गामाता मंदिर परिसरात भरलेल्या यात्रेनंतर साचलेला प्लास्टिक कचरा गोळा करण्यासाठी लहान मुलींनी पुढाकार घेतला. या मोहिमेत तब्बल १३७ किलो प्लास्टिक कचरा गोळा करण्यात आला. गोळा केलेले प्लास्टिक पुनर्प्रक्रियेसाठी पाठविण्यात आले. या उपक्रमातून स्वच्छतेबरोबरच पर्यावरण संवर्धन, सामाजिक बांधिलकी आणि नागरिकांच्या जबाबदारीची जाणीव करून देण्यात आली.

या उपक्रमाचे वैशिष्ट्य म्हणजे, काही दिवसांपूर्वी ज्या मुली यात्रेत आनंदाने फिरण्यासाठी आल्या होत्या, त्याच मुली परिसर स्वच्छ करण्यासाठी हातात हातमोजे, मुखपट्ट्या, झाडू आणि सुपड्या घेऊन मैदानात उतरल्या. यात्रेतील आनंददायी आठवणींपलीकडे जाऊन परिसरातील अस्वच्छता दूर करण्याची जबाबदारी त्यांनी स्वीकारली. त्यांच्या या कृतीतून पर्यावरण रक्षणाचा संदेश समाजापर्यंत पोहोचला. नवरात्रोत्सवाच्या काळात दुर्गामाता मंदिर परिसरात मोठी यात्रा भरते. या यात्रेत विविध दुकाने, खाद्यपदार्थांचे स्टॉल आणि नागरिकांची मोठी वर्दळ असते. मात्र, यात्रा संपल्यानंतर स्टॉलच्या मागील बाजूस आणि परिसरात मोठ्या प्रमाणावर प्लास्टिक कचरा साचल्याचे दिसून आले. या समस्येकडे दुर्लक्ष करण्याऐवजी तो कचरा स्वतः गोळा करून परिसर स्वच्छ करण्याचा निर्णय मुलींनी घेतला. त्यामुळे हा उपक्रम केवळ स्वच्छता मोहीम न राहता सामाजिक जाणीव जागृत करणारा अनुभव ठरला.

या उपक्रमात अभियंता अनया अग्रवाल यांचा पुढाकार आणि पर्यावरण संवर्धनाविषयीची जाणीव विशेष उल्लेखनीय ठरली. स्वच्छतेचा संदेश केवळ फलक, घोषणा किंवा भाषणांपुरता मर्यादित न ठेवता तो प्रत्यक्ष कृतीतून समाजासमोर आणण्याच्या संकल्पनेतून अशा उपक्रमांचे महत्त्व अधोरेखित होते. लहान वयातील मुलींना सामाजिक प्रश्नांची जाणीव करून देणे, त्यांना प्रत्यक्ष कामात सहभागी करणे आणि पर्यावरण रक्षणाची जबाबदारी स्वतःपासून सुरू करण्याची प्रेरणा देणे, ही या उपक्रमाची महत्त्वाची बाजू ठरली.

अभियंता अनया अग्रवाल यांच्या या उपक्रमातून स्वच्छता ही केवळ एक दिवसाची मोहीम नसून ती दैनंदिन जीवनाचा भाग बनली पाहिजे, हा विचार पुढे आला. परिसरात कचरा साचल्यानंतर तो उचलण्याबरोबरच कचरा निर्माण होणार नाही, यासाठी प्रत्येकाने काळजी घेणे आवश्यक आहे. विशेषतः प्लास्टिकचा (पान ३ वर)



मराठवाडा पदवीधर मतदारसंघ निवडणुकीसाठी भारतीय जनता पार्टीचे जालना महानगर जिल्हाध्यक्ष भास्कर आबा दानवे यांनी राष्ट्रीय हिंदी विद्यालय येथे मतदानाचा हक्क बजावला.